दैनिक
# समर्थ राजयोग
https://samarthrajyog.com/
E-Mail : dainiksamarthrajyogbeed@gmail.com
SAMARTH RAJYOG
वैभव विवेक स्वामी
सपादक
राजमान्य, राजशक्ती
No.LSB / Beed / RNP - 200 / 2024 - 2026.
बीडसह छत्रपती संभाजीनगर, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, लातूर, धाराशिव या जिल्ह्यातून एकाच वेळी प्रकाशित होणारे एकमेव मराठवाडा स्तरीय विभागीय

शुद्ध सोने ! अप्रतिम कलाकुसर !! विश्वासाची परंपरा !!!
प्रमाणित सुवर्ण अलंकाराचे AC दालन
दहिवाळ
सुवर्णकार
नवीन पत्ता : डी.पी.रोड, सहयोगनगर, सारडा नगरी जवळ, बीड
☎: 0230377, मो. 8432771777
शाखा : माळीवेस, बीड
☎: 0220377, मो. 9405072777

बीड (महाराष्ट्र) दैनिक मराठी | वर्ष - ५ वे अंक -३५३ | मंगळवार,दि.२६ ऑगस्ट २०२५ | 98 22 62 85 21 | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२०/७९८०१ | किंमत ३ रु | पाने ४
Beed | Daily Marathi | Year-5th | Issue-353 | Tuesday, Dt.26 August 2025 | 98 22 62 85 21 | RNI - MAHMAR/2020/79801 | Price 3 Rs. | Pages 4

# गेवराईत हाके-पंडित समर्थकांमध्ये जोरदार राडा

## विजयसिंह पंडितांची पहिली प्रतिक्रिया; म्हणाले, चिथावणीखोर वक्तव्य केल्याने...







बीडमध्ये झालेल्या ओबीसी समाजाच्या बैठकीत लक्ष्मण हाके यांनी राष्ट्रवादी अजित पवार गटाचे आमदार विजयसिंह पंडित यांच्याबद्दल आक्षेपार्ह विधान केले होते. ओबीसींच्या दारात आले तर दंडुका हातात घेणार, असे लक्ष्मण हाके यांनी म्हटले होते. यानंतर पंडित समर्थकांमध्ये संतापाची लाट उसळल्याचे पाहायला मिळाले. या विधानाचा निषेध करत गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात लक्ष्मण हाके यांच्या प्रतीकात्मक पुतळ्याचे दहन करण्यात आले. आंदोलकांनी दंडुके मारत पुतळ्याला आग लावली आणि जोरदार घोषणाबाजी करत निषेध व्यक्त केला. मनोज जरांगे यांच्या मुंबईतील आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पंडितांनी लावलेल्या बॅनरवरुन हा वाद पेटल्याचे पाहायला मिळाले आहे. याच दरम्यान, लक्ष्मण हाके हे गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौकात आले असता विजयसिंह पंडित यांच्या समर्थकांनी त्यांच्या गाडीवर दगडफेक केली. यावेळी हाके आणि पंडित यांचे समर्थक आमनेसामने आल्याचे पाहायला मिळाले. पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आहे. लक्ष्मण हाके आता बीडच्या दिशेला मार्गस्थ झाले आहेत. आता या प्रकरणावर विजयसिंह पंडित यांनी आपली प्रतिक्रिया दिली आहे.

### तुझ्यात दम असेल तर ये- हाके

त्यानंतर लक्ष्मण हाके यांनी पत्रकारांशी बोलताना म्हटले की, ओबीसी समाजाच्या बांधवांच्या मनात ऊर्जा निर्माण झाली पाहिजे. कोणाच्याही दहशतीखाली आम्ही राहणारे नाही आहोत. यावेळी बोलताना हाके यांनी शिवीगाळ करत म्हटले की तुमचं माणूस मुख्यमंत्र्यांना शिवीगाळ करतो. आम्ही सुद्धा मर्दाची औलाद आहोत. तुझ्या गावात आलो आहे ५०० किमी अंतरावर.


### लक्ष्मण हाके हे समाजा-समाजात तेढ निर्माण करतात- विजयसिंह पंडित

विजयसिंह पंडित यांनी या घटनेवर प्रतिक्रिया दिली आहे. लक्ष्मण हाके हे समाजा-समाजात तेढ निर्माण करण्याचे काम करत आहेत. त्यांचे हे काम मागच्या चार दिवसांपासून बीडमध्ये चालू होते. तीन-चार दिवसांपूर्वी त्यांनी माझ्या विरोधात अतिशय खालच्या स्तराची भाषा वापरली. दंडुक्याने मारेल, असे वक्तव्य केले. त्यांच्या या प्रतिक्रियेवर मी कुठेही भूमिका मांडली नाही. पण परत परत चिथावणीखोर वक्तव्य करायचे. आता आमचे समर्थक आणि सहाकरी यांची ही प्रतिक्रिया आहे. माझ्या समर्थकांनी त्या भागात जरांगे पाटील यांच्या आंदोलना संदर्भात बॅनर लावले असतील तर समाजासमाजात तेढ निर्माण होण्याचा काय प्रश्न आहे?, असा सवाल विजयसिंह पंडित यांनी केला.

# लातूरमध्ये कार-दुचाकीच्या भीषण धडकेत ३ ठार

लातूर : प्रतिनिधी

लातूर जिल्ह्यातील निलंगा तालुक्यातील लामजना महामार्गावर शनिवारी मध्यरात्री घडलेल्या भीषण अपघाताने रस्त्यावरील सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आणला आहे. करजगाव पाटीजवळ एका भरधाव कारने दुचाकीला जोरदार धडक दिल्याने सरवडी गावातील ३ तरुणांचा दुर्दैवी मृत्यू झाला.



या अपघातात दोन तरुणांचा जागीच मृत्यू झाला, तर तिस-या तरुणाने रुग्णालयात उपचारादरम्यान अखेरचा श्वास घेतला. कार चालकाने अपघातानंतर घटनास्थळावरून पळ काढल्याने पोलिसांनी त्याचा शोध सुरू केला आहे. या घटनेने संपूर्ण निलंगा तालुक्यात शोककळा पसरली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, सरवडी गावातील तीन तरुण सचिन कांबळे (वय २२), राहुल जाधव (वय २४) आणि विशाल पाटील (वय २३) हे लातूर शहरातील एका कार्यक्रमातून रात्री ११:३० च्या सुमारास दुचाकीवरून आपल्या गावाकडे परतत होते.

रात्रीच्या वेळी लामजना महामार्गावर वाहनांचा वेग जास्त असल्याने अपघाताचा धोका वाढतो. करजगाव पाटीजवळ विरुद्ध दिशेने येणा-या एका कारने त्यांच्या दुचाकीला जोरदार धडक दिली. धडक इतकी भीषण होती की, दुचाकीचे पूर्णपणे नुकसान झाले, आणि तिन्ही तरुण रस्त्यावर फेकले गेले.

अपघातानंतर स्थानिक ग्रामस्थांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली आणि जखमी तरुणांना जवळच्या निलंगा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले.

# गर्लफ्रेंडच्या तोंडात बॉम्ब टाकून बॉयफ्रेंड पळाला

मैसूर : कर्नाटकच्या मैसूर जिल्ह्यातील एका गावातून अत्यंत धक्कादायक आणि हृदयद्रावक घटना समोर आली असून इथे एका २० वर्षीय विवाहित महिलेची तिच्या प्रियकराने क्रूरपणे हत्या केली. आरोपीने महिलेच्या तोंडात स्फोटक पदार्थ घालून स्फोट घडवला, ज्यामुळे तिचा चेहरा पूर्णपणे विद्रूप झाला आणि तिचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात भीतीचे वातावरण पसरले आहे.



या घटनेचे फोटो आणि व्हीडीओ समोर आल्यानंतर संपूर्ण राज्यात खळबळ उडाली आहे. महिलेचा मृतदेह एका लॉजच्या खोलीत पलंगावर पडलेला आढळला, तर खोलीच्या जमिनीवर सर्वत्र रक्त पसरले होते. पोलिसांनी मृत महिलेची ओळख रक्षिता म्हणून पटवली आहे, जी गेरासनहल्लि गावाची रहिवासी होती. रक्षिताचा विवाह केरळमधील एका मजुरासोबत झाला होता, पण तिचे तिच्या नातेवाईक असलेल्या सिद्धराजु सोबत प्रेमसंबंध होते. रविवारी हे दोघे भेर्या गावातील एका लॉजमध्ये थांबले होते.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, तिथे दोघांमध्ये काही कारणावरून जोरदार भांडण झाले. याच वादातून आरोपीने महिलेच्या तोंडात बॉम्ब सदृश स्फोटक पदार्थ घातला आणि खाणींमध्ये जिलेटिनच्या कांड्या उडवण्यासाठी वापरण्यात येणा-या ट्रिगरचा वापर करून स्फोट घडवला.

**आरोपीचा बनाव उघड**

हल्ल्यानंतर आरोपीने पोलिसांची दिशाभूल करण्याचा प्रयत्न केला. त्याने सांगितले की महिलेचा मृत्यू मोबाइल फोनच्या स्फोटामुळे झाला आहे. पण, त्याच्या बोलण्यावर कोणाचाही विश्वास बसला नाही. त्यानंतर तो घटनास्थळावरून पळून जाण्याचा प्रयत्न करत असताना स्थानिकांनी त्याला पकडले आणि पोलिसांच्या ताब्यात दिले. या प्रकरणी पुढील तपास सुरू आहे.

# पीक विमा कंपनीकडून २५ टक्के अग्रीम नुकसानभरपाई बंद, सरकारच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिमगा आंदोलन

## पुर्वीप्रमाणेच ट्रेगर करण्यात यावेत - डॉ.गणेश ढवळे

बीड ।प्रतिनिधी

पीक विमा कंपन्यांचे दलाल झालेले राज्य सरकार शेतकऱ्यांच्या मुळावर उठले आहे. पीक विमा योजनेतून नुकसान भरपाईसाठी पात्र असलेले लाभार्थी नुकसान भरपाई अनुदानापासून वंचित राहणार आहेत. याच्या निषेधार्थ जिल्हाधिकारी कार्यालयासमोर शिमगा आंदोलन करून डॉक्टर गणेश ढवळे यांच्या सहकाऱ्यांनी सरकारच्या विरोधात निदर्शने केली.



प्रामुख्याने स्थानिक आपत्तीमुळे झालेले नुकसान, काढणीपूर्व किंवा काढणीनंतर झालेले नुकसान, पेरणी न झाल्याने झालेले नुकसान हे महत्वाचे निकषच वगळण्यात आले आहेत.यामुळे शेतकऱ्यांनी तक्रार केल्यानंतर पंचनामा करून मिळणारी २५ टक्के अग्रीम रक्कम आता मिळणार नाही. सरकारने नुकसानीची पाहणी करून पंचनामे करण्याच्या सूचना जिल्हा प्रशासनाला दिल्या असल्या तरी स्थानिक आपत्तीचे ट्रेगर रद्द केल्याने आठवडाभरात झालेल्या नुकसान भरपाईची मागणी पीक विम्यातून होणारच नाही. त्यामुळे सरकारने संकटाच्या काळात नियमित हक्काची मदत २५ टक्के अग्रिम देण्यासाठी पुर्वीप्रमाणेच ट्रेगर सुरू करावेत

# निवडुंग वाडी येथे ह भ प आप्पासाहेब चौरे महाराज यांचे कीर्तन संपन्न

बीड ।प्रतिनिधी

बीड तालुक्यातील निवडंगवाडी येथे चालत असलेल्या अखंड हरिनाम सप्ताहामध्ये सहाव्या दिवसाची कीर्तन सेवा ह भ प आप्पासाहेब चौरे महाराज श्रीक्षेत्र चोंडी तालुका धारूर यांनी केली. निवडुंग वाडी मध्ये गावकऱ्यांच्या सहकार्यातून अखंड हरिनाम सप्ताह मोठ्या उत्साहात सुरू आहे.या सप्ताहात महाराजांनी प्रारब्ध क्रियामान या अभंगावर सविस्तर असे आध्यात्मिक विवेचन केले.यावेळी महाराजांनी क्रमाचे प्रकार सांगितले संचितावर माणसाचे प्रारब्ध ठरते. पूर्वसंचित चांगले असेल तर प्रारब्ध चांगले ठरते. कर्माची गती फार कठीण आहे. कर्माने राम वनवासास गेला. राजा दशरथ पुत्रांच्या मुळे मृत्युमुखी पडला. कर्माचा परिणाम जगाच्या बापाला आणि मालकाला भोगाव लागलेला आहे. पण भक्त आणि संत याला अपवाद आहेत. यासाठी महाराजांनी भक्त बिभीषण आणि कृष्णाचा भक्त सुदाम्या यांची उदाहरणे देऊन उपस्थितांना मंत्रमुग्ध करून सोडले.यावेळी गावातील महिला पुरुष मंडळी, तरुण मंडळी तसेच डोईफोडवाडी सानपवाडी सोनपेठ दहिफळ वडमाऊली व जैताळवाडी येथील मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. अशी माहिती डोईफोडवाडी निवडुंग वाडीचे माजी सरपंच प्रा. तात्यासाहेब डोईफोडे सर यांनी दिली.

**जाहिरातदारांना विनम्र आवाहन...!**

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

स.न.वि.वि.

मागील ५ वर्षांपासून मराठवाडा स्तरावर प्रकाशित होणारे शासनमान्य यादीवरील 'दै.समर्थ राजयोग' चा ६ वा वर्धापन दिन शुक्रवार दि.५ सप्टेंबर २०२५ रोजी साजरा करण्यात येणार आहे. आजपर्यंत आपल्या पाठवळावर कणखर बाणा कायम ठेवून निर्भीडपणे लिखन करत वृत्तपत्र वाचकांच्या विश्वासाला पात्र ठरले आहे. या निमित्ताने आम्ही 'वर्धापन दिन विशेषांक २०२५' चा विशेषांक प्रकाशित करत आहोत. या विशेषांकामध्ये आपल्या संस्थेची प्रतिष्ठाणची, व्यवसायाची अथवा वैयक्तिक जाहिरात देवून वृत्तपत्राला भक्कम आर्थिक साथ द्यावी ही नम्र विनंती.

जाहिरातीचे ऑनलाईन पेमेंट पाठवण्यासाठी

गुगल पे/फोन पे नंबर
9822628521
दै.समर्थ राजयोग
बँक : बँक ऑफ महाराष्ट्र
A/c No. - 60392843322
IFC Code - MAHB0001689
MICR Code - 431014303

जाहिरात दरपत्रक

| अ.क्र | विवरण | साईज | रक्कम |
|---|---|---|---|
| १. | रंगीत | पूर्ण पान | ४०,०००/- |
| २. | रंगीत | अर्धे पान | २०,०००/- |
| ३. | रंगीत | पाव पान | १०,०००/- |
| ४. | रंगीत | शुभेच्छा | ५,०००/- |

₹5000/- ची जाहिरात देऊन वार्षिक वर्गणीदार विनामुल्य व्हा...!

जाहिरात पाठविण्यासाठी संपर्क
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

**वाचकांना विनम्र आवाहन...!**

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
६ वा वर्धापन दिन विशेषांक-२०२५

रोखठोक प्रतिक्रिया पाठवण्याबाबत

दैनिक समर्थ राजयोग या शासनमान्य वृत्तपत्राचा शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी 6 वा वर्धापन दिन होत आहे. या निमित्त प्रकाशित होणाऱ्या विशेष अंकामध्ये आपण या वृत्तपत्राबद्दल आपले आलेले अनुभव, परखड मत व्यक्त करू शकता.

आपणास विनम्र विनंती आहे की, आपण कमी शब्दात आशय पूर्ण प्रतिक्रिया तात्काळ व्हाट्सअप नंबर 98 22 62 85 21 यावर आपल्या पासपोर्ट फोटोसह पाठवावी...ही विनम्र विनंती...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521
दै.समर्थ राजयोग
सम्राट चौक, शाहुनगर, बीड
Email : dainiksamarthrajyogbeed@gmail.com

**सस्नेह निमंत्रण**

दै.समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
05 सप्टेंबर
6 वा वर्धापन दिन..!

शुक्रवार दिनांक 5 सप्टेंबर 2025 रोजी शिक्षक दिनी दैनिक समर्थ राजयोग या वृत्तपत्राचा 6 वा वर्धापन दिन आहे.

या वर्धापन दिन सोहळ्यासाठी आपण खास निमंत्रित आहात.

शुक्रवार, दिनांक 5 सप्टेंबर 2025
वेळ - सकाळी 11 ते सायंकाळी 6 पर्यंत....

स्थळ : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, नगर रोड, बीड

टीप - स्नेही जणांना विनंती आहे की, कृपया वर्धापन दिनानिमित्त शाल, श्रीफळ, पुष्पगुच्छ स्वीकारले जाणार नाहीत. या ऐवजी इच्छेनुसार शैक्षणिक साहित्य आणावे. आपले हे शैक्षणिक साहित्य गरजवंत होतकरू विद्यार्थ्यांना दिले जाईल... धन्यवाद...

आपलाच
वैभव जगदेवी विवेक स्वामी
संपादक - मो.9822628521

संपादकीय

# येवा कोकण तुमचाच आसा...!

कोकणामध्ये गणेशोत्सव, शिमगोत्सव हे सण रायगड, रत्नागिरी, सिंधुदुर्ग जिल्ह्यांमध्ये उत्साहाने साजरे केले जातात. नोकरी-व्यवसायाच्या निमित्ताने कोकणातील गावाबाहेर शहरांमध्ये असणारा कोकणवासीय गणेशोत्सव आणि शिमगोत्सव या दोन सणांच्या निमित्ताने आपल्या गावात येतात. दिवाळीच्या सणाला आपल्या गावाला येणाऱ्यांची संख्या फार कमी आहे. मग कोकणातील ग्रामदेवतांचे उत्सव, जत्रोत्सव याला ही सर्व मंडळी गावात येतात; परंतु कोकणात सार्वजनिक गणेशोत्सवापेक्षा घरोघरी गणेशमूर्तीचे पूजन केले जाते.

त्यामुळेच कोकणातील इतरवेळी बंद असलेली घरे या गणेशोत्सवाच्या निमित्ताने उघडलेली दिसतात. कोकणातील प्रत्येक गावातील वातावरणात उत्साह असतो. निसर्गातील हिरवेपणा मनाला निश्चितच आल्हाददायक वाटत राहते. सगळीकडे हिरवेगार निसर्गाने एक वेगळं वातावरण तयार झालेलं असत. गणपती उत्सवात साऱ्या वेदना, दु:ख, तंटे, बखेडे विसरून कोकणातील सर्वसामान्य शेतकऱ्यांपासून श्रीमंतांपर्यंत सर्वजण गणेशाच्या आगमनाची वाट पाहत असतात.

प्रत्येक घरात मुंबई, पुणे तसेच नोकरीनिमित्त अन्य भागांत राहिलेला प्रत्येकजण परतलेला असतो. त्यांच्या येण्याने गावात राहणारी वृद्ध आपल्या लेकरांच्या ओढीने भावनिकदृष्ट्या फार अस्वस्थ असतात. गावातील वृद्धांच्या नजरा मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर अशा शहरांमध्ये असणाऱ्या आपल्या लेकरांच्या येण्याने आणि ज्याची वर्षभर गणपती कधी येणार म्हणून वाट पाहणारे सारेच फार उत्साही आनंदी असतात. यामुळे कोकणात गणपती उत्सवाला प्रत्येकाची पावले रेल्वे, एस. टी. किंवा स्वत:च्या वाहनानेदेखील आपल्या घरी परतलेली असतात. यावर्षीही महाराष्ट्र सरकारने कोकणात स्वत:च्या वाहनाने येणाऱ्यांना टोलमाफी केली आहे.

दीड-दोन हजार मुंबई ते कोकणप्रवासात टोल भरावा लागत होता. त्या पार्श्वभूमीवर कोकणात या गणेशोत्सवासाठी जाणाऱ्या गणेशभक्त प्रवाशांना मोठा दिलासा मिळाला आहे. कोकणात येणारा गणेशभक्त यावर्षी देखील मुंबई-गोवा महामार्गाने सुखकर प्रवास करत येऊ शकणार नाही. मुंबई-गोवा महामार्गावर आजही रत्नागिरी आणि रायगड जिल्ह्यात काही भागांत महामार्गाची काम अपूर्ण आहेत. मात्र, तरीही गतवर्षीपेक्षा यावर्षी अधिक चांगली स्थिती आहे.

कोकणातील मुंबई-गोवा महामार्गाचा प्रवास कोकणवासीय चाकरमान्यांना पुढच्यावर्षीपर्यंत तरी चांगला होईल अशी अपेक्षा करायला काहीच हरकत नाही. यावर्षीच्या गणेशोत्सवासाठीची टोलमाफी २३ ऑगस्ट ते २८ सप्टेंबर या कालावधीमध्ये मुंबई-बंगळूरु राष्ट्रीय महामार्ग, मुंबई-गोवा राष्ट्रीय महामार्ग तसेच सार्वजनिक बांधकाम विभाग आणि महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या अखत्यारीतील रस्त्यांवरील टोल नाक्यांवर गणेशोत्सवाच्या काळात कोकणात जाणाऱ्यांसाठी वाहनांना, एस. टी बसेसना टोलमाफी देण्यात येणार आहे. 'गणेशोत्सव २०२५-कोकण दर्शन' या नावाने हा पास वाहनांना देण्यात येणार आहे.

# अन्यायकारक अधिभार व वाढीव विज देयक आकारून घरगुती विजग्राहकांची लुट - उल्हास गिराम

## विधुतवितरण अभियंत्यास शिवसेनेचे निवेदन

बीड ।प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्यातील विज ग्राहकांवर अन्यायकारक अधिभार व वाढीव विज रक्कम लादून हे भाजप शासित सरकार सामान्य घरगुती विज ग्राहकांची लुट करत असल्याचे निदर्शनास आल्या नंतर आज या विषयी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी महाराष्ट्र राज्य विधुत वितरण कंपनी च्या अभियंत्यास निवेदन दिले.

महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित यांचेकडून आकारण्यात येणाऱ्या वीज देयकांमध्ये सामान्य घरगुती ग्राहकांवर असह्य आर्थिक भार टाकण्यात येत असल्याची बाब सर्वत्र निदर्शनास येत आहे. मासिक ९६ युनिट इतका अल्प वापर असूनही देयकाची रक्कम सुमारे रुपये ८५४ इतकी होत आहे. त्यामध्ये निव्वळ उर्जा शुल्क अंदाजे रुपये ४०० असून उर्वरित रक्कम विविध अधिभार व स्थिर शुल्काच्या स्वरूपात आकारली जाते.उर्जा शुल्क, वहन शुल्क, प्रसारण शुल्क, व्हिलींग शुल्क, इंधन समायोजन अधिभार, स्थिर शुल्क तसेच विविध कर व अधिभार यांच्या आकारणीमुळे सामान्य ग्राहकांवर अतिरिक्त भार येत आहे. औद्योगिक व व्यापारी ग्राहकांवर लावावयाचे अधिभार प्रत्यक्षात घरगुती ग्राहकांवर लादले जात आहे.

विशेषत्वाने निदर्शनास आणून देणे आवश्यक



आहे की, स्मार्ट मीटर बसविण्याची योजना प्रत्यक्षात खाजगी कंपनीच्या फायद्यासाठी राबविण्यात आलेली असून, त्यातून सामान्य नागरिकांना बिल वाढणे, चुकीचे रीडिंग, आणि ग्राहक सेवेत होणाऱ्या त्रुटी यामुळे अनेक अडी अडचणींचा सामना करावा लागत आहे. या संदर्भातील तक्रारींची दखल घेतली जावी व तातडीने स्वतंत्र चौकशी करणे आवश्यक असल्याचे निवेदनाद्वारे निदर्शनास आणून दिले.ग्राहकांच्या हितरक्षणाकरिता शासनाने तातडीने पुढीलप्रमाणे कार्यवाही करणे आवश्यक आहे,१. घरगुती ग्राहकांच्या वीज देयकातील सर्व अधिभारांचे पारदर्शक व तपशीलवार स्पष्टीकरण सार्वजनिक करावे.२. शंभर युनिटपर्यंत वापरणाऱ्या घरगुती ग्राहकांसाठी अधिभार व स्थिर शुल्कावर मर्यादा घालून संरक्षित दर लागू करावेत.३. स्मार्ट मीटर संदर्भातील सर्व तक्रारींची स्वतंत्र चौकशी करून ग्राहकांना योग्य पर्याय उपलब्ध करून द्यावेत.४. औद्योगिक व व्यावसायिक ग्राहकांचे अधिभार घरगुती ग्राहकांवर टाकले जाणार नाहीत, याबाबत स्पष्ट निर्देश द्यावेत.५. विलंबाने देयक भरल्यास घरगुती ग्राहकांचे विद्युत कनेक्शन तात्काळ तोडण्याऐवजी किमान पंधरा दिवसांची मुदत द्यावी.६. दरवाढ निश्चित करताना विद्युत निर्मिती खर्च, इंधन खर्च व वाहतूक खर्चाचा तपशीलवार हिशेब घेऊनच निर्णय घ्यावा.७. इंधन समायोजन अधिभार व इतर आकारणीच्या माध्यमातून जादा वसुल झाल्यास ती रक्कम पुढील देयकात कपात करून ग्राहकांना परत करावी.८. महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाच्या सार्वजनिक सुनावणीमध्ये शहरी व ग्रामीण भागातील ग्राहक प्रतिनिधींना अनिवार्यपणे सामावून घेण्यात यावे.९. कृषी ग्राहकांना अधिभारातून सवलत देऊन त्यांच्या कनेक्शन तोडण्यापूर्वी किमान तीस दिवसांची मुदत देण्यात यावी.१०. स्मार्ट मीटर भारतीय मानक ब्युरो प्रमाणित असल्याची खात्री करून, चुकीच्या देयकाबाबत ग्राहकांना तातडीने भरपाई मिळण्याची तरतूद करावी.११. गरीब व मध्यमवर्गीय घरांकरिता विशेष सवलतीचे दरपत्रक लागू करावे.वरीलप्रमाणे कार्यवाही तातडीने करण्याबाबत आपल्या स्तरावरून संबंधिताना निर्देश द्यावेत, अशी मागणी शिवसेना जिल्हाप्रमुख उल्हास गिराम यांनी केली. यावेळी जिल्हाप्रमुख मीराताई नवले, उपजिल्हाप्रमुख राजूभाऊ महुवले, जिल्हा संघटक संजय महाद्वार, माजी .प .स नवनाथ प्रभाळे ,विधानसभा प्रमुख सुशील भैया पिंगळे, हनुमान काशिद ,कामगार सेना रवी वाघमारे,, गणेश लोणकर , सतीश परदेशीं, शरद पवार सुनील जगताप , रमेश नवले, रंगनाथ पैठणकर ,बलराज कोटुळे , विशाल तांबे सह शिवसैनिक उपस्थित होत.



बीड- येथील मांजरसुंबा येथे सवांद बैठकीदरम्यान संघर्षयोद्धा मा.मनोज (दादा) जरांगे पाटील हे आले असता त्यांचा भव्य सत्कार करताना अखिल भारतीय छावा संघटनेचे बीड जिल्हाध्यक्ष अशोक आण्णा रोमन यांच्यासह आदी.



किल्ले धारूर ।प्रतिनिधी

येथील मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळाचे राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये दि. २५ ऑगष्ट २०२५ रोजी प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांच्या हस्ते सर्वज्ञ चक्रधर स्वामींच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे, आयक्यूएसी समन्वयक डॉ. एल. बी. जाधवर, कार्यालय अधीक्षक श्री. सुभाष वायाळ यांबरोबरच सर्व प्राध्यापक, प्रशासकीय कर्मचारी व विद्यार्थ्यांची उपस्थिती मोठ्या संख्येने होती.

# माजी सैनिक सोपानराव गायकवाड यांच्या स्मरणार्थ

## जननेता सन्मान २०२५ चे पुरस्कार जाहीर !



### अभिनेता मिलिंद शिंदे, संतोष मानूरकर, अनिल जाधव, गणेश सावंत, विजयराज बंब, डॉ. सिद्दीकी, तहसीलदार चंद्रकांत शेळके, उत्तम पवार, प्रदीप रोडे, आत्माराम वाव्हळ, विशाल गायकवाड, गितांजली लव्हाळे वानखडे यांचा होणार सन्मान

### १५ ऑक्टोबर रोजी मान्यवरांच्या हस्ते पुरस्काराचे थाटात होणार वितरण

बीड ।प्रतिनिधी

देशाच्या सीमेवर डोळ्यात तेल घालून देशसेवा करणारे माजी सैनिक सोपानराव दादा गायकवाड यांच्या स्मरणार्थ व जननेताच्या वर्धापन दिनाच्या अनुषंगाने विविध क्षेत्रात भरीव काम करणाऱ्या गुणवंत व्यक्तींना राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मानीत केले जाणार आहे.सदरील पुरस्कार दिनांक १५ ऑक्टोबर रोजी प्रमुख मान्यवरांच्या शुभहस्ते वितरीत करण्यात येणार असल्याची माहिती संपादक नंदू गायकवाड यांनी दिली.

पुरस्कार प्राप्त मान्यवरामध्ये पत्रकारांसाठी आदर्श आणि दीपस्तंभ ठरणारे शांत, संयमी व सदैव हसमुख असलेले दैनिक दिव्य लोकप्रभाचे संपादक संतोष मानुरकर, दैनिक रिपोर्टरचे कार्यकारी संपादक गणेश सावंत आणि दैनिक राज्य लोकतंत्रचे उपसंपादक अनिल जाधव, पत्रकार गितांजली लव्हाळे वानखडे ,यांना राज्यस्तरीय आदर्श पत्रकार पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच दैनिक लोकाशाचे संपादक विजय बंब यांची उत्कृष्ट राज्यस्तरीय आदर्श समाजसेवक पुरस्कारासाठी निवड करण्यात आली आहे. बीडचे तहसीलदार चंदकांत शेळके यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय प्रशासकीय अधिकारी तर पॅराडाईज हॉस्पिटलचे डॉ. सिद्दीकी यांना राज्यस्तरीय आदर्श वैद्यकीय क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल सन्मान करण्यात येणार आहे. सरस्वती शिक्षण प्रसारक मंडळाचे संस्थापक अध्यक्ष उत्तम पवार आणि तुलसी शिक्षण समूहाचे अध्यक्ष प्रा. प्रदीप रोडे सर यांना उत्कृष्ट राज्यस्तरीय आदर्श संस्थाचालक पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात येणार आहे.विनाअनुदानित शाळा कृती समितीचे जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ सर यांचा राज्यस्तरीय आदर्श शिक्षक पुरस्कार देऊन सन्मान करण्यात येणार आहे. तसेच बेस्ट कर्मचारी म्हणून महाराष्ट्र राज्य वीज वितरणचे कर्मचारी विशाल गायकवाड यांना देखील गौरविण्यात येणार आहे.अशी माहिती सायं. दैनिक जननेताचे संपादक नंदू गायकवाड यांनी दिली.



# अंकुशराव टोपे महाविद्यालयाचा पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांच्यातर्फे गौरव

फारुक शेख :- स्वातंत्र्य दिनानिमित्त पोलीस अधीक्षक कार्यालय, जालना यांच्या वतीने अंकुशराव टोपे महाविद्यालयातील विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्ती विषयावर विशेष कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या कार्यक्रमाअंतर्गत विद्यार्थ्यांसाठी व्यसनमुक्तीवर आधारित लेखी परीक्षेचे आयोजन करण्यात आले होते.या परीक्षेमध्ये महाविद्यालयातील अनेक विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवला. परीक्षेच्या निकालानुसार रुद्र प्रताप साहू याने प्रथम क्रमांक, कु. प्रांजल पोपळे हिने द्वितीय क्रमांक, तर संजय मिसाळ याने तृतीय क्रमांक पटकावला. या तिघा गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार पोलीस अधीक्षक श्री. अजय कुमार बंसल यांच्या हस्ते करण्यात आला.कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी अप्पर पोलीस अधीक्षक श्री. आयुष नोपाणी हे होते. यावेळी पोलीस उपअधीक्षक रवींद्र निकाळजे, पो.कॉ.संजय सोनवणे, तसेच महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. रामप्रसाद भालेकर आणि विद्यार्थ्यांचे पालक यांची उपस्थिती लाभली होती.विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. दादासाहेब गजहंस, उपप्राचार्य डॉ. संजय पाटील, उपप्राचार्य प्रा. पांडुरंग खोजे तसेच सर्व प्राध्यापकवर्ग यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.या उपक्रमामधून विद्यार्थ्यांमध्ये व्यसनमुक्तीबाबत जागरूकता निर्माण झाली असून, अशा उपक्रमांमुळे समाजामध्ये सकारात्मक बदल घडून येण्यास हातभार लागतो, असे उपस्थित मान्यवरांनी सांगितले.


तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५४३ दि.२२.०८.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमती सुनिता गोकुळ साळुंके, रा.वडीलासुरा ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | वेदिका गोकुळ साळुंके | मुलगी | २१.११.२०२१ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २२/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५८७ दि.२५.०८.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान इब्राहीम कासम बागवान रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगी**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | मिनाज मोहमंद इब्राहीम बागवान | मुलगी | ०७.०१.१९८६ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-५८६ दि.२५.०८.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान इब्राहीम कासम बागवान रा.अंबड ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगा**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | अस्लम इब्राहीम बागवान | मुलगा | ०१.०२.१९८४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- २५/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड
जा.क्र.२०२५/सेतु/कावि-२८८ दि.१४.०८.२०२५

### जाहिर प्रगटन

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड यांचे न्यायालय**

अर्जदार **श्रीमान शेख मुजीब इब्राहीम, रा.बोरी ता.अंबड जि.जालना** यांनी यांच्या **मुलगां**च्या जन्म / मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म /मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | जन्म दिनांक |
|---|---|---|---|
| १ | शेख रेहान मुजीब | मुलगा | १७/०८/२०१० |
| २ | शेख आसेफा मुजीब | मुलगा | १०/०२/२००८ |

निबंधकानी दिलेल्या जन्म /मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.

तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी

आज दिनांक- १४/ ०८ /२०२५ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित/-**
**तहसिलदार तथा**
**कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

# तळणी येथे शांतता समितीची बैठक; राजकीय व सामाजिक कार्यकर्त्यांना बोलविण्यास पोलिसांना विसर, ग्रामस्थांत नाराजी

तळणी (प्रतिनिधी)

मंठा तालुक्यातील तळणी येथे गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर सोमवारी पोलिस प्रशासनाच्या वतीने शांतता समितीची बैठक घेण्यात आली. मात्र गावातील राजकीय, सामाजिक क्षेत्रात सक्रियपणे काम करणारे कार्यकर्ते तसेच पत्रकार यांना बैठकीचे निमंत्रण न दिल्याने ग्रामस्थ व कार्यकर्त्यांत तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.

शांतता समितीच्या बैठकीत उत्सव काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी, नागरिकांना कोणत्याही प्रकारच्या अडचणी निर्माण होऊ नयेत, तसेच ग्रामस्थ व कार्यकर्त्यांकडून सूचना मिळाव्यात यासाठी ही बैठक घेण्यात येते. मात्र यावेळी केवळ औपचारिकतेपोटी बैठक घेऊन सोपस्कार पार पाडल्याची टीका स्थानिकांकडून होत आहे.

अवैध धंद्यांवर प्रश्नचिन्ह

या बैठकीदरम्यान गावातील काही तरुणांनी थेट मंठा पोलीस निरीक्षकांसमोर गावातील सुरू असलेल्या अवैध धंद्यांचा मुद्दा उपस्थित केला. गावात अवैध धंदे सुरू असतानाही पोलीस प्रशासन त्याकडे का दुर्लक्ष करते? असा थेट सवाल ग्रामस्थांनी केला. त्यामुळे काही काळ वातावरण तापले होते.

प्रतिष्ठीत व कार्यकर्त्यांना टाळले?

गेल्या अनेक वर्षांपासून शांतता बैठकीसाठी गावातील प्रतिष्ठीत व्यक्ती, विविध पक्षांचे प्रतिनिधी व सामाजिक कार्यकर्त्यांना निमंत्रण देण्याची प्रथा आहे. मात्र यावर्षी अनेकांना जाणीवपूर्वक टाळण्यात आल्याची चर्चा रंगली. नव्या पोलीस निरीक्षकांचा गावातील दोन नंबर धंदे करणाऱ्यांशी परिचय व्हावा म्हणूनच ही बैठक झाली, त्यामुळेच इतरांना बोलावले गेले नाही, असे ग्रामस्थांमध्ये बोलले जात आहे.

शिवसेना (उबठा) ने व्यक्त केली नाराजी

या प्रकरणी शिवसेनेचे (उबठा) तालुका संघटक ज्ञानेश्वर सरकटे यांनी प्रशासनावर तीव्र नाराजी व्यक्त केली. ते म्हणाले -

सोमवारी गणेशोत्सव व ईद-ए-मिलादच्या पार्श्वभूमीवर शांतता समितीची बैठक घेण्यात आली. मात्र या बैठकीत राजकीय, सामाजिक कार्यकर्ते व पत्रकार यांना आमंत्रणच देण्यात आले नाही. उत्सव काळात शांतता राखण्यासाठी उपाययोजना व सूचना घेण्याऐवजी फक्त औपचारिक सोपस्कार पार पाडण्यात आले. हे गंभीर दुर्लक्ष असून यामुळे बैठकीचा मूळ हेतूच फोल ठरला आहे.

ग्रामस्थांची अपेक्षा

नागरिकांचे म्हणणे आहे की, अशा बैठकीत विविध क्षेत्रातील कार्यकर्त्यांचा सहभाग महत्त्वाचा असतो. त्यांच्या सूचनांचा विचार केल्यासच उत्सव काळातील कायदा व सुव्यवस्थेची हमी मिळू शकते. परंतु यावेळी झालेल्या दुर्लक्षामुळे बैठकीचा उपयोग केवळ नावापुरताच झाला.पुढील काळात अशा बैठका खर्या अर्थाने सर्वसमावेशक व फलदायी व्हाव्यात, अशी अपेक्षा नागरिकांनी व्यक्त केली आहे



माजलगाव - पीपल्स रिपब्लिकन पार्टीच्या वतीने दि. २५/८/२०२५ सोमवार रोजी एस.डी.पी.ओ. शैलेश गायकवाड सर रुजू झाल्याबद्दल शुभेच्छा देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी तालुकाध्यक्ष राकेशदादा साळवे,पत्रकार रवींद्र राऊत, युवराज निसर्गंध,नितीन गायकवाड सह मान्यवर.

# सावरखेडा गोंधन येथे स्वातंत्र्यदिन जल्लोषात - दोन्ही शाळांचा पहिलाच ऐतिहासिक संयुक्त सोहळा

जाफराबाद ।प्रतिनिधी

जाफराबाद तालुक्यातील सावरखेडा गोंधन देशाचा ७९ वा स्वातंत्र्यदिन सावरखेडा गोंधन येथे अभूतपूर्व उत्साहात साजरा करण्यात आला. सकाळी प्रभातफेरीने कार्यक्रमाची सुरुवात झाली. प्रभातफेरीत गावकरी, विद्यार्थी व शिक्षकांनी मोठ्या संख्येने सहभाग घेतला. त्यानंतर ध्वजारोहणाचा सोहळा पार पडला व वातावरण देशभक्तीमय झाले.



यंदाचा स्वातंत्र्यदिन गावाच्या इतिहासात विशेष ठरला. कारण जिल्हा परिषद शाळा सावरखेडा गोंधन व जिल्हा परिषद शाळा सावरखेडा नवीन वस्ती या दोन शाळांनी स्थापना झाल्यापासून प्रथमच संयुक्तपणे स्वातंत्र्यदिन साजरा केला. या निमित्ताने आयोजित सांस्कृतिक कार्यक्रमात विद्यार्थ्यांनी देशभक्तिपर गीतं, भाषणं व नृत्य सादर करून प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. या ऐतिहासिक सोहळ्याने गावकऱ्यांची मने जिंकली. तसेच बदली झालेले शिक्षक श्री. साबळे सर व भालके मॅडम यांचा गावकऱ्यांच्या वतीने यांना निरोप दिला व सत्कार करण्यात आला. त्यांच्या कार्याची प्रशंसा करून त्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.या कार्यक्रमाला गावातील सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य, दोन्ही शाळांचे अध्यक्ष, पालक तसेच शिक्षणप्रेमी मंडळी उपस्थित होती. गावातील शिक्षणप्रेमी ह.भ.प. नंदकिशोर वायाळ महाराज यांनी मार्गदर्शन करत विद्यार्थ्यांचा उत्साह वाढविला.सांस्कृतिक कार्यक्रमानंतर गावकऱ्यांनी विद्यार्थ्यांचे व शिक्षकांचे मनापासून कौतुक केले. या निमित्ताने जिल्हा परिषद शाळांचे महत्त्व अधोरेखित झाले व इंग्रजी शाळेपेक्षा आपल्या शाळेतील विद्यार्थी कितीतरी अधिक प्रगत असल्याचा विश्वास ग्रामस्थांच्या मनात दृढ झाला.गावकरी, पालक, शिक्षक व विद्यार्थ्यांच्या उत्स्फूर्त सहभागामुळे स्वातंत्र्यदिन सोहळा अविस्मरणीय, ऐतिहासिक व प्रेरणादायी ठरला.

# ...अखेर वाढीव टप्पा अनुदानाचा शासनादेश निर्गमित

विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्ह्याच्या वतीने शासनाचे आभार !

बीड (प्रतिनिधी) राज्य शासनाने राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान पावसाळी अधिवेशनात मंजूर केल्यानंतर त्या संदर्भातला शासनादेश अखेर आज सोमवार दिनांक २५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ७:३६ सुमारास निर्गमित करून विना अनुदानित शाळेच्या वाढीव टप्पा अनुदानाच्या प्रश्न मार्गी लागला. त्याबद्दल राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांचे विनाअनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वतीने वैजनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, जिल्हाध्यक्ष आत्माराम वाव्हळ यांनी जाहीर आभार मानले.



राज्यातील विना अनुदानित शाळांना वाढीव टप्पा अनुदान मिळावे या मागणीसाठी सातत्याने शिक्षक संघटनेच्या वतीने आंदोलन करण्यात येत होते. आंदोलनाच्या मागणीचा पाठपुरावा करत असताना ८ आणि ९ जुलै रोजी शिक्षक समन्वय संघाच्या वतीने मुंबईतील आझाद मैदानात मोठे आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनाप्रसंगी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी या आंदोलनाची दखल घेतली. तसेच सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनामध्येच वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची तरतूद करून असे आश्वासन दिले. नुसता आश्वासन देऊन मुख्यमंत्री थांबले नाहीत तर मुख्यमंत्र्यांनी दुसऱ्याच दिवशी म्हणजेच ९ जुलै रोजी वाढीव टप्पा अनुदानासाठी लागणाऱ्या निधीची घोषणा केली. केवळ घोषणा करून सरकार थांबले नाही. तर यावेळी वाढीव टप्प्यासाठी लागणाऱ्या ९७० कोटी रुपयांची आर्थिक तरतूद केली. शिवाय ०१ ऑगस्ट २०२५ रोजी पासून प्रत्येक शिक्षकांच्या खात्यात वाढीव टप्प्याचा पगार देणार असल्याचे आश्वासन दिले. परंतु अधिवेशन संपून महिना दीड महिना झाला तरी शासन आदेश निर्गमित झाला होत नसल्याने शिक्षण समन्वय संघाच्या वतीने मंत्रालय स्तरावर सातत्याने पाठपुरावा सुरू ठेवला. 'बोले तैसे चाले' या म्हणीप्रमाणे राज्याचे लोकप्रिय मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री तथा अर्थमंत्री अजित पवार, दुसरे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांनी शासनादेश निर्गमित करण्यासंदर्भात प्रशासनाला आदेश दिले. त्यानंतर शासन आदेश निर्गमित करण्यासाठी हालचाली सुरू केल्या. अखेर आज सोमवार दिनांक २५ रोजी सायंकाळी ७:३६ वाजण्याच्या सुमारास वाढीव टप्पा अनुदानाचा शासन आदेश निर्गमित केला. शासन आदेश निर्गमित होताच महाराष्ट्र राज्य विना अनुदानित शाळा कृती समिती बीड जिल्हा शाखेच्या वैजिनाथ चाटे, जितेंद्र डोंगरे, लक्ष्मण जगताप, विजयसिंह शिंदे, मुक्ताताई मोटे-अर्दड मॅडम, बीड जिल्हा अध्यक्ष आत्माराम वाव्हळ, रामदास जामकर, शेख सर,बाळासाहेब नागरगोजे, रवींद्र भुक्कन, जावेद पठाण, दिपक गरुड, चंद्रशेखर तौर, अंकुश गवळी, प्रताप पवार, भागवत यादव, अशोक मोरे, सुरेश कदम यांच्यासह इतर पदाधिकाऱ्यांनी वतीने आनंद साजरा करून शासनाचे आभार मानले.

# वारकरी जिल्हा साहित्य संमेलनाची नियोजन बैठक संपन्न....!

## महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाचे असेल अर्थसहाय्य
## मराठी भाषा प्रचार, प्रसार करण्यासाठी संमेलनात भरगच्च कार्यक्रम ....!

पैठण ।प्रतिनिधी

विशाल बहुद्देशीय प्रतिष्ठान पैठण या संस्थेच्या अंतर्गत येत्या चार आणि पाच डिसेंबर २०२५, गुरुवार आणि शुक्रवार रोजी दोन दिवसीय वारकरी जिल्हा साहित्य संमेलन श्रीक्षेत्र आपेगाव (माऊलीचे जन्मस्थान) तालुका पैठण येथे आयोजित करण्या संदर्भात संयोजन समितीची बैठक आयकॉन पॅराडाईज इंग्लिश स्कूल आणि ज्युनिअर कॉलेजच्या सभागृहामध्ये पार पडली.

संस्थेचे अध्यक्ष प्रा.संतोष तांबे यांच्या अध्यक्षतेखाली संपन्न झालेल्या या बैठकीत महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या वतीने जिल्हा साहित्य संमेलन अनुदानाच्या प्रस्तावास मंजुरी मिळाल्याबद्दल शासनाच्या अभिनंदनाचा ठरावही या बैठकीत एकमताने घेण्यात आला. मराठी भाषा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी या संमेलनात भरगच्च कार्यक्रम आयोजित करण्यात येणार आहेत. या संमेलनास छत्रपती संभाजीनगर जिल्हाभरातून आणि लगतच्या जिल्ह्यातून मान्यवर लेखक, साहित्यिक, कलावंत, वक्ते निमंत्रित केले जाणार असल्याची माहिती संस्थाध्यक्ष प्रा.संतोष तांबे, संयोजन समितीचे सदस्य बजरंग काळे, प्रकाश लोखंडे, शिवाजी गाडे, जालिंदर फलके, सुभाष



शिंदे, प्राचार्य संदीप काळे, प्राचार्य आर.बी.रामावत, डॉ. जालिंदर येवले, उदय सुलाखे, लक्ष्मण खेडकर, सौ.लता पवार, नारायण (पोपट सर) औटे, सुनील चितळे, विष्णू ससाणे, योगेश पाटील फासाटे यांनी दिली.

लवकरच स्वागताध्यक्ष, संमेलनाध्यक्ष, उद्घाटक, प्रमुख पाहुणे यांची निवड जाहीर केली जाईल. वारकरी अभ्यासक साहित्यिकांना निमंत्रित केले जाणार आहे. संमेलनाची आकर्षक आणि संदर्भ ग्रंथ स्वरूपात स्मरणिका प्रकाशित करणाऱ्या येणार आहे. संत ज्ञानेश्वर महाराज यांच्या ७५० व्या जयंती उत्सवानिमित्त या संमेलनाला विशेष महत्त्व असेल. संमेलनातील सर्व कार्यक्रमांमध्ये युवकांचा आणि वारकरी संप्रदायाचा सहभाग वाढावा यासाठी विशेष प्रयत्न केले जाणार आहेत.

संमेलनात भरगच्च कार्यक्रम

संमेलनात उद्घाटन, समारोप, सांस्कृतिक कार्यक्रम, तीन परिसंवाद, दोन कवी संमेलने, एक कथाकथन, एक मुलाखत घेण्याचा मानस आहे. प्रत्येक सहभागी कलावंत/वक्ते/लेखक यांना संत ज्ञानेश्वर महाराज (माऊली) यांची संगमरवरी मूर्ती देण्याचा मानस आहे.



# राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये राष्ट्रीय अवकाश दिनानिमित्त व्याख्यान संपन्न

किल्ले धारूर ।प्रतिनिधी

मराठवाडा शिक्षण प्रसारक मंडळ संचलित राजमाता जिजाऊ महाविद्यालयामध्ये ५१ महाराष्ट्र बटालियन राष्ट्रीय छात्र सेना औरंगाबाद यांच्या वतीने सोशल सर्विस अँड कम्युनिटी डेव्हलपमेंट ऍक्टिव्हिटी अंतर्गत राष्ट्रीय अवकाश दिना निमित्त जय विज्ञान जय अनुसंधान या उपक्रमांतर्गत डॉ. स्मिता बसोले यांचे ग्रीकल्चरल प्रॉडक्टिव्हिटी याविषयावरील अतिथी व्याख्यान यशस्वीपणे पार पडले. व्याख्यानातून कृषी संसाधन प्रक्रिया एनसीसी कॅडेट्सना समजावून दिली. अध्यक्षीय समारोपातून प्राचार्य डॉ. गोपाळ काकडे यांनी विस्तृत मार्गदर्शन केले.कार्यक्रमासाठी प्रमुख उपस्थिती म्हणून उपप्राचार्य प्रा. महादेव जोगडे, पर्यवेक्षक प्रा. सच्चिदानंद ढेपे यांचे उपस्थिती होती. कार्यक्रमाच्या प्रास्ताविकातून आयोजक उपप्राचार्य मेजर डॉ. मिलिंद गायकवाड यांनी कार्यक्रमाच्या आयोजना मागील भूमिका सांगितली. कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील एनसीसी कॅडेट्स, विद्यार्थी, प्राध्यापक व प्रशासकीय कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन

# ई-पीक नोंदणीच सर्व्हर डाऊन; शेतकरी वैतागले

## प्रशासनाची मार्गदर्शन करण्याची गरज

जाफ्राबाद ।प्रतिनिधी

शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळवायचा असेल, तर ई-पीक पाहणी करणे बंधनकारक आहे. शासनाने पिकांची अचूक नोंद ठेवण्यासाठी डिजिटल पद्धतीचा अवलंब केला असून, यामुळे शेतातील पीक, क्षेत्र आणि त्यावरील उत्पादनाची माहिती थेट शासकीय यंत्रणेकडे पोहोचते. मात्र, ई-पीक पाहणी नाही केली तर विमा योजना,अनुदान,मदत योजनांचा लाभ घेण्यात अडचणी निर्माण होऊ शकतात. त्यामुळे प्रत्येक शेतकऱ्याने आपल्या शेतातील पिकांची नोंद अधिकृत डीसीएस मोबाईल पद्वारे १ ऑगस्ट ते १४ सप्टेंबरपर्यंत ई-पीक पाहणी करून घ्यावी लागणार आहे. जेणेकरून शासनाच्या अनुदान व पीकविमा यासह अन्य योजनेचा लाभ घेण्यासाठी ही नोंदणी अनिवार्य आहे.


खरीप हंगाम २०२५ अंतर्गत या योजनेचा लाभ घेण्यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या शेतात कोणती पीक घेतले आहे याचे अचूक माहिती पीक पाहणी प्रणाली द्वारे शासनाकडे नोंदविणे आवश्यक आहे.जाफराबाद तालुक्यातील शेतकरी आपल्या शेतातील ई-पीक पाहणी नोंदवण्यासाठी मोबाइलद्वारे प्रयत्न करत आहेत. शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार मोबाइल प वापरून शेतातून पीक पाहणीची प्रक्रिया सुरू झाली असली, तरी डीसीएस मोबाइल पचा सर्व्हर वारंवार डाउन होत असल्याने शेतकऱ्यांना अडचणींचा सामना करावा लागत आहे. शेतकरी तासन्तास शेताच्या चारही बांधावर फिरूनही माहिती सबमिट करू शकत नाहीत, त्यामुळे वेळ, श्रम आणि डेटा वाया जात आहे. ई- पीक पाहणी पचा सर्व्हर डाऊन होत असल्याने शेतकरी वैतागले असल्याचे चित्र जाफराबाद तालुक्यात पाहायला मिळत आहे.

ई-पीक पाहणीसाठी डीसीएस मोबाइल ॲपवर माहिती भरत असताना वारंवार अडचणी येत आहेत. माहिती भरताना सर्व्हर बरोबर संपर्क होत आहे, कृपया वाट पहा असा संदेश झळकतो, परिणामी शेतकरी माहिती वेळेत सबमिट करू शकत नाहीत. त्यामुळे प्रशासनाने मार्गदर्शन करावे.

श्री.राजु पाटील वाकडे _(प्रगतशिल शेतकरी)

अंतिम तारीख १४ सप्टेंबर...

यंदाच्या खरीप हंगामातील ई-पीक




पाहणीची अंतिम तारीख १४ सप्टेंबर आहे. वेळेत नोंदणी न झाल्यास शेतकऱ्यांना भरपाई व शासकीय योजनांचा लाभ मिळण्यात अडचण येईल. सर्व्हर डाऊन होत असल्याने शेतकरी वर्गामध्ये चिंतेचे वातावरण आहे.

# शेतकरी हक्क संघर्ष समितीची स्थापना

## कर्जमाफी, शेतकरी प्रश्नांवर राज्यव्यापी आंदोलनाचा निर्धार

छत्रपती संभाजीनगर / प्रतिनिधी

राज्यातील शेतकऱ्यांच्या मूलभूत प्रश्नांवर निर्णायक लढा उभारण्यासाठी शेतकरी-शेतमजूर हक्क संघर्ष समितीची स्थापना आज (सोमवार, दि. २५ ऑगस्ट २०२५) छत्रपती संभाजीनगर येथे झालेल्या राज्यस्तरीय शेतकरी हक्क बैठकीत करण्यात आली.

निवडणुकीच्या जाहीरनाम्यात दिलेली आश्वासने अद्यापही पूर्ण न करणाऱ्या शासनाविरोधात शेतकरी संघटनांनी जोरदार नाराजी व्यक्त केली. शेतकरी कर्जमाफी, चडझ वर २० टक्के हमीभाव, तसेच शेतकरी कुटुंबांवर ओढवणाऱ्या संकटांवर तातडीने तोडगा न काढल्यास राज्यव्यापी आंदोलन छेडण्याचा इशारा यावेळी देण्यात आला.

बैठकीत घेण्यात आलेले प्रमुख निर्णय :



१. दि. २८ ऑक्टोबर २०२५ रोजी मुंबई येथे राज्यव्यापी आंदोलन.

२. राज्यातील सर्व विभागनिहाय संयुक्त परिषदांचे आयोजन.

३. शेती प्रश्नांचा अभ्यास गट स्थापन करून शासनास ठोस शिफारसी सादर करणे.

४. शेतकरी-शेतमजूर हक्क संघर्ष समितीची अधिकृत स्थापना.५. कर्जमुक्ती, उत्पादन खर्चावर आधारित दीडपट हमीभाव, बोगस खते-बियाणे प्रश्न, शेतमजूर कल्याण महामंडळ, कृषीनिविष्ठांवरील ऋढ्ढ माफी, गावनिहाय पीकविमा व खते-बियाणे तपासणीसाठी टेस्टिंग लॅब अशा मुख्य मागण्यांसाठी एकजुटीने लढण्याचा निर्धार.या बैठकीस विजय जावंधिया, बच्चू कडू, महादेव जानकर, डॉ. अजित नवले, कैलास पाटील, अनिल घनवट, प्रकाश पोहरे, विठ्ठलराजे पवार, प्रशांत डिक्कर, विजय कुंभार, काशिनाथ जाधव आदी शेतकरी नेते प्रत्यक्ष उपस्थित होते. तर राजू शेट्टी व राजेश टोपे यांनी ऑनलाइन माध्यमातून सहभाग नोंदवला.राज्य सरकारने तातडीने सकारात्मक भूमिका न घेतल्यास, येत्या आंदोलनाला मोठ्या प्रमाणावर शेतकरी वर्ग रस्त्यावर उतरणार असल्याचा इशारा या बैठकीत देण्यात आला.

# भगवान विद्यालयात राष्ट्रीय अंतराळ दिन उत्साहात साजरा



बीड ।प्रतिनिधी

भगवान विद्या प्रसारक मंडळ बीड संचलित भगवान विद्यालयामध्ये दि. २३ ऑगस्ट २०२५ रोजी राष्ट्रीय अंतराळ दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक अंकुशराव आघाव सर यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषविले. प्रमुख अतिथी म्हणून उप मुख्याध्यापक गर्जे सर, पर्यवेक्षक ढोकर सर तर डोळे सर, विज्ञान विषयाचे ज्येष्ठ शिक्षक वडमारे सर यांची विचार मंचावर प्रमुख उपस्थिती होती. रांगोळीतून नभांगण दर्शन श्रीमती सानप वंदना मॅडम, श्रीमती मोरे मॅडम यांनी विद्यार्थीनींच्या साहाय्याने घडवले.

मान्यवरांचे स्वागत शेख सर, शिंदे सर व सानप सर यांनी केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक सचिन वडमारे सर यांनी केले. कुमारी साक्षी पिंगळे या विद्यार्थीनीने मनोगतातून भारतीय अंतराळ संस्था, संस्थेचे कार्य, चांद्रयान मोहीम याविषयीची माहिती सांगितली. इयत्ता सहावीच्या विद्यार्थ्यांनी ग्रह ताऱ्याची माहिती चार्टच्या माध्यमातून सांगितली. चांद्रयान मोहीम व अंतराळ संस्थेतील भारतीय वैज्ञानिकांचे योगदान यासंबंधी बहुपर्यायी प्रश्न प्रश्नमंजुषेतून याप्रसंगी विचारण्यात आले. विद्यार्थ्यांनी यथायोग्य त्यांची उत्तरे दिली.इयत्ता दहावीचे विद्यार्थी मोघे अजय, नागरगोजे रोहिदास, सोनसळे राजेश यांनी रॉकेटची प्रतिकृती तयार केली. रॉकेट लॉन्चिंगचे प्रात्यक्षिक उनवणे युवराज व मगर युवराज इयत्ता दहावीच्या विद्यार्थ्यांनी केले.

प्रमुख अतिथी असलेले शाळेचे उपमुख्याध्यापक गर्जे सर यांनी राष्ट्रीय अंतराळ दिनाचे महत्त्व विशद केले. अध्यक्षीय समारोपातून शाळेचे मुख्याध्यापक आघाव सर यांनी राष्ट्रीय अंतराळ दिनाच्या सर्वांना शुभेच्छा देऊन कार्यक्रमाचे आयोजक विज्ञान विषयाचे सर्व अध्यापक यांचे कौतुक करून चांद्रयान मोहीम व राष्ट्रीय अंतराळ दिन याची महती सांगून मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कु. वाघमारे प्रणिता या विद्यार्थिनीने केले. तर उपस्थितांचे आभार पर्यवेक्षक श्री ढोकर सर यांनी मानले. कार्यक्रमासाठी सर्व शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते. सामूहिक प्रार्थनेने कार्यक्रमाची सांगता झाली.

# २९ ऑगस्ट चलो मुंबई मराठा आरक्षणाची आरपारची लढाई

## मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने सहभागी व्हावे.. राजेंद्र मस्के



बीड ।प्रतिनिधी

गेली ४० वर्षापासून मराठा आरक्षणाचा लढा चालू आहे. राजकीय हेतूने प्रेरित होऊन शासनकर्ते मराठा आरक्षणाकडे दुर्लक्ष करत आले आहेत. ओबीसी मधून मराठा बांधवांना आरक्षण मिळाले पाहिजे.या न्याय मागणीसाठी दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी आझाद मैदान मुंबई येथे मनोज दादा जरांगे पाटील यांच्या उपस्थितीत आंदोलन होणार आहे. भावी पिढीच्या भवितव्या साठी मराठा बांधवांनी लाखोच्या संख्येने या लढ्यात सहभागी व्हावे असे आवाहन राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष राजेंद्र मस्के यांनी केले आहे.

बीड तालुक्यातील पाटोदा (बे) येथे श्रीक्षेत्र नारायण गडांचे महंत शिवाजी महाराज यांच्या मार्गदर्शना खाली चौदाव्या अखंड हरिनाम सप्ताहाची सांगता नारायण गडाचे नूतन उत्तराधिकारी हभप संभाजी महाराज यांच्या कीर्तनाने झाली. पंडित तुपे व त्यांचे सहकारी अमोल माने,अविनाश बडगे, बाबू माने, चंद्रसेन माने, भरत माने, दादा गोंदवले, गोविंदा गोंदवले, अशोक तुपे, यांच्यासह समस्त गावकरी मंडळींनी खंड हरिनाम सप्ताहाचे यशस्वी नियोजन केले. सांगता समारोप प्रसंगी परिसरातील भावीक फक्त बहुसंख्येने सहभागी झाले होते.

## पूरग्रस्तांच्या सेवेत डॉक्टरांचा देवदूत : जमिनीवर बसून तपासणी, मोफत औषध वाटपाने लोकांच्या चेहऱ्यावर उमटला दिलासा



नांदेड । शिवकुमार बिरादार

मुखेड,पूरग्रस्तांच्या वेदना अजूनही संपलेल्या नाहीत. उद्ध्वस्त संसार, वाहून गेलेली शेती, घरदार गमावलेले कुटुंब अशा अंधारमय परिस्थितीत जेव्हा आजारपणाने ग्रस्त नागरिकांना आधाराची गरज होती, तेव्हा त्यांच्यासाठी 'देवदूत' ठरलेले नाव म्हणजे डॉ. श्रीहरी बुडगेमवार. पूरग्रस्त भागातील हसणार भिंगोली भेंडेगाव व इतर गावोगावी फिरून जमिनीवर बसून रुग्ण तपासणे, त्यांच्या आजाराचे संयमाने ऐकून घेणे, प्रिस्क्रिप्शन लिहून देणे आणि मोफत औषध वाटप करून लोकांना दिलासा देणे हे त्यांचे कार्य खऱ्या अर्थाने प्रेरणादायी ठरले आहे.

पूरामुळे आरोग्य सेवा कोलमडलेल्या असताना, एका डॉक्टरने स्वतःची जबाबदारी ओळखून ती स्वीकारली ही गोष्ट गावकऱ्यांसाठी मोठा दिलासा आहे. पूरानं संसार नेला पण डॉक्टर साहेबांनी वेळ दिली, औषध दिलं हाच आमच्यासाठी मोठा आधार आहे, असे नागरिक कृतज्ञतेने सांगत होते.वृद्ध असो वा महिला, लहान मुले असो वा तरुण–प्रत्येकाच्या आरोग्याची चिंता करत डॉ. बुडगेमवार यांनी केलेली सेवा म्हणजे 'माणुसकीचा खरा धडा' आहे. त्यांची साधी, जमिनीवरची तपासणी आणि औषध वाटपाची सेवा लोकांच्या चेहऱ्यावर पुन्हा आशेचा किरण निर्माण करत आहे. 'पूरग्रस्तांच्या वेदनेत सामील होऊन आरोग्याचा श्वास देणारा डॉक्टर' अशी ओळख डॉ. श्रीहरी बुडगेमवार यांनी समाजात निर्माण केली आहे.

# भारतीय क्रांतीकारक हुतात्मा शिवराम राजगुरु यांची ११७ वी जयंती साजरी ....!

पैठण ।प्रतिनिधी

महेंद्र सिमेंट ण्ड स्टील तथा डॉ बाबासाहेब आंबेडकर सेवाभावी संस्थेचे संस्थापक अध्यक्ष.श्री महेंद्र राजगुरू यांच्या चांगतपुरी येथील कार्यालयात शहीद राजगुरु यांची ११७ वी जयंती मोठया उत्साहात साजरी करण्यात आली . फटाक्यांच्या आतशबाजीत, देशभक्तीपर गीतांच्या आवाजात,व असंख्य देशप्रेमी नागरीकांच्या उपस्थितीत.शहीद राजगुरू,भगतसिंग, सुखदेव यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पन करून संपन्न झाली. महेंद्र राजगुरू यांनी शहीद राजगुरु यांच्या विषयी मोलाची माहीती सांगीतली. यावेळी आयोजक महेंद्र राजगुरु,बाळासाहेब तट्टू, बाळासाहेब झारगड,शौकत पठाण,सूर्यकर्ण खेडकर,साईनाथ होरकटे,जगन्नाथ माने,खंडू नलभे यांच्या सह गोकुळ होरकटे,वैजनाथ बांगर,राजेंद्र खेडकर,प्रकाश राजगुरू,श्रीमंत खाडे,नागेश चोरमले,शुभम होरकटे,दिपक नवगिरे,रामनाथ कानडे,गणेश चोरमले,बाळू शिंदे,प्रणय चोरमले,नवनाथ किसे,प्रतीक नवगिरे,भाऊसाहेब खाडे,दत्ता चोरमले,रमेश नलभे,बाळासाहेब चोरमले,नवनाथ घायतलक,अरिहंत राजगुरु,अमोल धायगुडे,प्रणय राजगुरु,कृष्णा



राजगुरू,बालाजी माने,नामदेव राजगुरू,कुमार ठाकूर आदींनी प्रतिमेस पुष्पहार व पुष्प अर्पण करुन आदरांजली वाहिली.यावेळी मान्यवरांनी भगतसिंग,सुखदेव,राजगुरु यांच्या कार्याबद्दल आपले विचार मांडले. सदरील कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी चांगतपुरी गावातील अनेक मान्यवर व विविध पक्ष व संघटनेतील कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन शौकत पठाण यांनी केले तर बाळासाहेब झारगड व महेंद्र राजगुरू यांनी उपस्थितांचे आभार मानले.




# परतुर तालुक्यात अवैध धंदे माफीयांचे जाले! पोलीस यंत्रणांचे दुर्लक्ष!

## परतूर तालुक्यातील साईबाबा समोर धाब्यावर अवैध देशी विदेशी दारू विकणारे वर जिल्हा पोलीस अधीक्षक लक्ष देणार का?

परतूर (प्रतिनिधी)

परतुर तालुक्यात सर्वात मोठे बेकायदेशीर अवैध देशी विदेशी विकणारे धाबे व अवैध मटका खेळणारे परतुर पोलीस ठाण्याचा विक्रेत्यांना अर्थपूर्ण अभय आहे , जालना जिल्ह्यात पोलिसांचा वचक राहिला असल्याने बेकायदेशीर धंदे बंद करने हे परतुर पोलिसांचे काम आहे परंतु परतूर पोलिसांना हप्त्यापुढे काहीच दिसत नाही, परतूर पोलिसांनी धृतराष्ट्रा ची भूमिका घेतली आहे,

परतूर पोलिसांच्या हप्तेखोरीमुळे आणि कारवाई न करण्याच्या भूमिकेमुळे अवैध धंदा वाल्याची व्यवसायकांची गुंडगिरी वाढली. आहे तसेच परतुर येथे अनेक म्हणजेच शेकडो लहानमोठे अवैध धंदे आपला व्यवसाय करतात. त्यातही मोठया संख्येने साईबाबा रोडवर वाटूर सेलू रोडावर आजूबाजू धाब्यावर बेकायदेशीर देशी व विदेशी विकणारे व्यवसाय थाटून परिसरात दहशत निर्माण केली आहे. कोणतीही कायदेशीर परवानगी नसताना धाब्यावर अवैध देशी विदेशी दारू विक्रेते राजरोसपणे हेव्यवसाय वाढवितात. त्यांच्या या कृत्यातून पोलिसांचा वचक नसल्याचे दिसत जरी असले तरी पोलिसांना आर्थिक सुगीचे दिवस आले आहेत.जबाबदार पोलीस अधिकाऱ्यांनी वेळीच लक्ष घालून कारवाईचे आदेश द्यावेत, परंतु परतूर पोलीस लक्ष देतील असे वाटत नाही.परतुर तालुक्यात विविध भागात दारू विक्रेत्यांनी आपले धंदा बस्तान बसविले आहे तसेच अवैध मटका परतुर तालुक्यात जिथे नाही म्हणलं तिथे पण सुरू आहे जालना जिल्हा पोलीस अधीक्षक व सर्व विषयावर लक्ष घालून कारवाई करणार असं तरी जनतेला वाटत आहेसाईबाबा सेलू रोड येथे अवैध दारूचे धाबे सर्रास सुरू आहे रात्री बे रात्री साईबाबा समोर उभा राहिला तर भीतीच वातावरण नागरिक समोर येत आहे दारू पिऊन साईबाबा चौफुली समोर बेवडे धिंगाणा घालत आहे एखादा माणूस दिसला की त्याच्या अंगावर जायचं त्याला शिवगाडा करायचे रात्री पेट्रोल पंप वर पेट्रोल टाकायला जायचं असलं तर नागरिकांना विचार करून जावं लागत आहे की कोणी आमच्या अंगावर तर नाही येणार ना आम्हाला कोणी मारणार तर नाही ना अशी भूमिका साईबाबा चौफुली जवळ अवैध दारू धाब्यावर विकण्यामुळे झालेली आहे २७ तारीख ला गणपती विराजमान होणार आहे तरी पोलीस प्रशासनांना साईबाबा समोर बंदोबस साठी दोन पोलीस रात्र दिवस बसून ठेवावे अशी मागणी परतुर चे नागरिक करीत आहे

# विश्व बंधुत्व दिनानिमित्त ब्रह्माकुमारीज बीड यांच्या तर्फे आयोजित भव्य रक्तदान शिबिर संपन्न

## संचालिका कु. प्रज्ञा दीदींच्या पुढाकारातून ९८ रक्तदात्यांनी सहभाग नोंदवत विक्रमी

# ७१ युनिट्स रक्त संकरीत झाले !

बीड ।प्रतिनिधी

प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय, बीड यांच्या वतीने राजयोगिनी दादी प्रकाशमणि (पूर्व मुख्य प्रशासिका) यांच्या १८ व्या पुण्यतिथीच्या निमित्ताने दरवर्षीप्रमाणे यंदाही विश्वबंधुत्व दिवस साजरा करण्यात आला. या दिवसाचे औचित्य साधून दिनांक २४ ऑगस्ट २०२५ रोजी विद्यालय परिसरात भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले. या शिबिराचे आयोजन २२ ते २५ ऑगस्ट दरम्यान संपूर्ण भारत व नेपाळभर करण्यात येत आहे. केंद्रीय आरोग्य मंत्री श्री. जे.पी. नड्डा यांनी १७ ऑगस्ट रोजी नवी दिल्ली येथील ओ.आर.सी. मध्ये वैश्विक विश्वबंधुत्व दिवसानिमित्त ब्लड डोनेशन ड्राईव्ह या राष्ट्रीय रक्तदान महाअभियानाचा शुभारंभ केला. त्यांनी ब्रह्माकुमारी संस्थेच्या सामाजिक कार्याचे कौतुक करताना, रक्तदान हे श्रेष्ठ दान असून, या माध्यमातून असंख्य रुग्णांना जीवनदान मिळू शकते, असे सांगितले.स्थानिक स्तरावर बीड येथील शिबिराचे उद्घाटन बी. के. प्रज्ञा दीदी संचालिका बीड सेवाकेंद्र, कविता जाधव मॅडम उपविभागीय दंडाधिकारी, राहुल बोरा अध्यक्ष रोटरी क्लब ऑफ बीड मिडटॉउन, बालाजी शेंडगे प्रमुख सिटी ब्लड बँक यांच्या शुभहस्ते करण्यात आले. प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालय ही एक सामाजिक–आध्यात्मिक संस्था असून ती समाजाच्या नैतिक व चारित्र्यात्मक उन्नतीसाठी कार्यरत आहे. जगभरातील १३७ देशांमध्ये आपल्या केंद्रांद्वारे ही संस्था सेवा पुरवत आहे. ज्ञानदान बरोबर रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. समाजामध्ये राहत असताना आपण ही या समाजाचे काही देणे लागतो यामुळे या शिबीरामध्ये आपला सहभाग नोंदवून भारतवासीयांसाठी आपण गुप्तदान करुन भाग्य कमवायचे आवाहन ब्रह्माकुमारीज् विद्यालयाच्या संचालिका ब्र.कु. प्रज्ञा दिदी यांनी केले आहे.या शिबिरात सिटी ब्लड बैंक, बीड यांचे सहकार्य लाभले. सकाळी ९ ते दुपारी ३ या वेळेत झालेल्या या शिबिरात



नागरिक, युवक, महिला, स्वयंसेवक यांनी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. एकूण ९८ रक्तदात्यांनी सहभाग नोंदला व ७१ युनिट्स रक्त संकरीत करण्यात आले. हा उत्साह समाजातील सेवा, त्याग आणि बंधुभाव अधोरेखित करणारा ठरला. या अभियानाचे उद्दिष्ट रक्ताची आवश्यकता पूर्ण करणे तसेच समाजामध्ये मानवी बंधुतेचे बंध दृढ करणे हे आहे. राष्ट्रीय रक्तदान महामहोत्सवाच्या निमित्ताने आयोजित या शिबिरात १ लाख युनिट रक्त संकलन करण्याचे लक्ष ठेवण्यात आले आहे ज्याद्वारे गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड, स्थापन होणार आहे.

शिबिराच्या यशस्वी आयोजनात ब्रह्माकुमारी संस्थेच्या संचालिका तसेच सिटी ब्लड बैंक यांनी महत्त्वाची भूमिका बजावली, अशा प्रकारे, विश्वबंधुत्व दिनानिमित्त आयोजित हे रक्तदान शिबिर समाजबंधुतेचा व मानवी सेवेचा संदेश देणारे ठरले.




हे पत्रक मालक,मुद्रक,प्रकाशक,संपादक वैभव विवेक स्वामी यांनी इंद्रधनुष्य प्रिंटिंग ॲण्ड पब्लिशर्स,सावता माळी चौक,मोंढा रोड,बीड,जिल्हा बीड येथे छापून दैनिक समर्थ राजयोग कार्यालय,छत्रपती कॉलनी,तहसील बॅक साईड,क्रांती नगर, बीड,जिल्हा बीड - ४३ ११ २२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले.

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER, EDITOR VAIBHAV VIVEK SWAMI AT ENDRADHANUSHYA PRINTING AND PUBLISHERS, SAVATA MALI CHOWK, MONDHA ROAD, BEED. DIST. BEED AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAINIK SAMARTH RAJYOG, CHATRAPATI COLONY, TAHASHIL BACK SIDE, KRANTI NAGAR, BEED, DIST. BEED-431122 ( MAHARSHTRA ).

# जिंतूर येथे दोन गटांत तुंबळ हाणामारी परिसरात तणावाचे वातावरण



परभणी /प्रतिनिधी

जिंतुर शहरातील साठे नगर परिसरात रविवारी (दि.२४) रात्री ९ च्या सुमारास कुरेशी समाजाच्या दोन गटांमध्ये सुरू झालेल्या किरकोळ वादाचे रूपांतर लाठीकाठी, लोखंडी रॉडच्या तुंबळ हाणामारीत झाले. या धुमश्चक्रीत सात जण गंभीर जखमी झाले असून त्यांना तातडीने परभणी जिल्हा रुग्णालयात हलविण्यात आले आहे.

जखमींची नावे इलाही तैय्यब कुरेशी (३२), अश्फाक मुसा कुरेशी (२५), बशीर करीम कुरेशी (४५), रतन आशाबी कुरेशी (४०), अन्वर तैय्यब कुरेशी (३५), शेख ईसा करीम कुरेशी (५२), फिरोज मुसा कुरेशी (४२) अशी आहेत. सर्व जखमींना प्राथमिक उपचारासाठी जिंतूर ग्रामीण रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी परभणी जिल्हा सामान्य रुग्णालयात हलविण्यात आले.

घटनेची माहिती मिळताच रुग्णालय परिसरात नागरिकांची मोठी गर्दी उसळली. वाढता तणाव लक्षात घेऊन जिंतूर पोलिसांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत बंदोबस्त उभा केला. यामुळे संभाव्य मोठा अनर्थ टळला. बातमी लिहीपर्यंत या प्रकरणी जिंतूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल झाला नव्हता. पुढील तपास सहायक पोलिस निरिक्षक चव्हाण करीत आहेत.

# लेंडी धरणाच्या पूरग्रस्तांना देगलूर, मुखेड शिवसेना (उ.बा. ठा) च्यावतीने राशन किट वाटप

मुखेड /प्रतिनिधी

महाराष्ट्राचे विरोधी पक्षनेते अंबादास दानवे साहेब यांचाकडून इयत्ता १२ वीत माध्यमिक व उच्च माध्यमिक महाविद्यालय, चव्हाणवाडी येथे विज्ञान शाखेत शिक्षण येणाऱ्या कुमारी स्वाती केरबा गुमडवाड या मुलीचे शैक्षणिक साहित्य या पाण्यात बुडाल्याने पुढील शिक्षणासाठी लॅपटॉप भेट दिला

मौजे हसनाळ तालुका मुखेड येथे शिवसेना बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने लेंडी धरणाच्या बुडीत क्षेत्रातील पूरग्रस्त नागरीकांना राशन किट वाटप करण्यात आले त्यात गहू, तांदूळासहीत इतर वस्तु, संसार उपयोगी साहित्य राषन,संसार उपयोगी भांडी,साडी,ब्लॅकेट आदी साहित्य वाटप व पुरात वाहून गेलेल्या गरीब



मुलीला कॅम्पुटर जिल्हा प्रमुख बबनराव बारसे यांच्या वतीने विधानपरिषदचे विरोधीपक्षनेते तथा शिवसेना मराठवाडा संपर्कनेते अंबादास दानवे साहेब व नांदेड जिल्हा संपर्कप्रमुख बबनराव थोरात साहेब यांच्या हस्ते वाटप करण्यात आले यावेळी बबनराव बारसे (जिल्हा प्रमुख नांदेड) , उपजिल्हाप्रमुख महेश पाटील, उपजिल्हाप्रमुख भालचंद्र नाईक, महानगर प्रमुख प्रकाश मारावार साहेब, देगलूर शिवसेना तालुकाप्रमुख बालाजी पाटील इंगळे खुतमापुरकर शिवसेना मुखेड शिवसेना तालुकाप्रमुख उमेश पाटील अडलूरकर , देगलूर शिवसेना शहर प्रमुख संजय अण्णा जोशी,देगलूर युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर, शंकर चिंतमवाड (शहर प्रमुख मुखेड) मंगेश पाटील कबनूरकर (शो.मी.विधानसभा प्रमुख) बालाजी पाटील काटशेव (युवासेना तालुका प्रमुख मुखेड) अणिल पा. जाधव( उपतालुकाप्रमुख) ,योगेश मामीलवाड (युवासेना शहर प्रमुख) व हसनाळ येथील पूरग्रस्त नागरिक उपस्थित होते..

# मुखेड तालुक्यातील पूरपरिस्थिती भीषण; जनावरांच्या मृत्यूमुळे शेतकरी हवालदिल

## शिवसेना विधानसभाप्रमुख म.ना. खंकरे यांची पालकमंत्री यांच्याकडे मागणी

मुक्रमाबाद /प्रतिनिधी

१७ ऑगस्ट रोजी मध्यरात्री झालेल्या ढग फुटी सदृश पावसामुळे मुखेड तालुक्यात भीषण पूरस्थिती निर्माण झाली आहे. नद्या–नाले तुडुंब भरून वाहू लागल्याने अनेक गाव पाण्याखाली गेले. शेतकऱ्यांचे उभे पिके वाहून गेली, घरांचे प्रचंड नुकसान झाले, तर शेकडो जनावरे दुर्दैवीरित्या मृत्युमुखी पडल्याने शेतकरी आर्थिक व मानसिक संकटात सापडले आहेत.

या गंभीर परिस्थितीचा तातडीने आढावा घेत मुखेड शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षाचे विधानसभाप्रमुख मन्मथ नागनाथप्पा खंकरे यांनी पालकमंत्री अतुल सावे यांना निवेदन देऊन शासनाकडे त्वरीत मदतीची मागणी केली आहे.

मुक्रमाबाद विभागातील अनेक जनावरे गुदमरून दगावले आहेत. या जनावरांच्या मृत्यूबाबत पंचनामे करून योग्य नुकसान भरपाई द्यावी. व तसेच शेती, घरे व शेतमजुरांचे झालेल्या नुकसानीचे तातडीने सर्वेक्षण करून मदत पोहोचवावी. व पूरग्रस्त भागात पिण्याच्या पाण्याची व आरोग्य सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. अश्या मागणीचे निवेदन पालकमंत्री यांना देण्यात आले.

या निवेदनावर शिवसेना शहरप्रमुख सदानंद घाळे, अनिल बेल्लेवार, बालाजी कदम, प्रसाद देवणे,अन्तेश्र्वर गोगा, विशाल गंदिगुडे, महेश खंकरे,आकाश देवकत्ते व स्थानिक पदाधिकारी व ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या करून



शासनाने तातडीने मदत जाहीर करावी, अशी एकमुखी मागणी करण्यात आली आहे...

फक्त पाहणी करून फोटो काढून जाणारे नेते नकोत, तातडीची मदत द्या! आम्ही कर भरतो, मतं देतो... मग आपत्तीच्या काळात आमच्या शेतकऱ्यांना वाऱ्यावर कसे सोडता? जर शासन मदत करेत नसेल तर आमच्या शेतकऱ्यांना कोण मदत करेल. लवकरात लवकर नुकसान झालेल्या शेतकऱ्यांना मदत करा.

मुक्रमाबाद विभागात शेकडो दुधाळ जनावरे पावसाच्या प्रवाहाने वाहून, गेले तर काही जागीच गुदमरून दगावले आहेत. याची नुकसान भरपाई तातडीची मिळावी

# रस्त्याचे काम न करताच उचलला निधी धर्मापुरी येथे ग्रामस्थांचा रास्ता रोको

परभणी/प्रतिनिधी

तालुक्यातील धर्मापुरी येथील ग्रामीण मार्ग क्रमांक ५४ या रस्त्याचे काम न करताच संबंधिताने संपूर्ण निधी उचलल्याचे निदर्शनास आले आहे. त्यामुळे अंदाजपत्रकाप्रमाणे काम करून देण्याच्या मागणीसाठी धर्मापुरी ग्रामस्थांनी परभणी – जिंतूर राष्ट्रीय महामार्ग अडवून धर्मापुरी येथे सोमवारी (दि. २५) रास्ता रोको आंदोलन केले.



जिल्हा नियोजन समितीच्या एसआरएफ योजनेतर्गत धर्मापुरी ग्रामीण रस्ता क्रमांक ५४ चे काम करण्यासाठी ४० लाख रुपयांचा निधी प्रस्तावित करण्यात आला. मात्र संबंधितांनी रस्ता काम न करता संपूर्ण निधी उचलला. याविषयी ग्रामस्थांनी जिल्हा प्रशासन आणि संबंधितांना वेळोवेळी निवेदन देऊन जाब विचारला मात्र कुठलाही प्रतिसाद न मिळाल्याने संतप्त ग्रामस्थांनी सोमवारी परभणी – जिंतूर राष्ट्रीय महामार्ग क्रं – ७५२के धर्मापुरी परिसरात रोखून धरत रास्ता रोको आंदोलन केले.

यावेळी संतोष देशमुख, तानाजी कदम नवनाथ पैठणे गोविंद कदम बाळासाहेब देशमुख ऋषिकेश बेटकर गोपाल कदम वैजनाथ कदम नागनाथ कदम सुरेश काळे रामराव कदम रवी डोंगरे मंगेश तिडके बाळासाहेब रेंगे पांडुरंग तिडके यांच्यासह धर्मापुरी व परिसरातील गावातील शेतकरी व ग्रामस्थांची मोठ्या संख्येने आंदोलनस्थळी उपस्थिती होती.या आंदोलनामुळे परभणी – जिंतूर राष्ट्रीय महामार्गावर आंदोलनाच्या दुतर्फा वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्या होत्या.

# मरखेल येथे सेवापूर्ती गौरव कार्यक्रम संपन्न

देगलूर, प्रतिनिधी

दिनांक २३ ऑगस्ट रोजी जिल्हा परिषद हायस्कूल मरखेल तालुका देगलूर जिल्हा नांदेड येथे सर्वोदय ग्रामविकास फाउंडेशन व ग्रामपंचायत कार्यालय मरखेल च्या संयुक्त विद्यमानाने सेवापुर्ती गौरव कार्यक्रम घेण्यात आला या कार्यक्रमाचे अध्यक्ष पंडित गव्हाले सरपंच मरखेल ,प्रमुख अतिथी म्हणून डॉक्टर मच्छिंद्र गवाले मानवी हक्क अभियान राज्यकार्य अध्यक्ष, संदीप पाटील उपसरपंच मरखेल ,मनोहर माली पाटील सेवानिव्रत माजी शिक्षण विस्तार अधिकारी मन्यार सर सेवानिवृत्त माजी शिक्षण विस्तार अधिकारी प्रदीप कुलकर्णी सर सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी अर्धे माजी पंचायत समिती सदस्य डॉक्टर धमणसुरे व इतर मान्यवर उपस्थित होते या सेवापूर्ती गौरव कार्यक्रमाचे प्रमुख मान्यवर अरुण गवळी सर सेवानिवृत्त केंद्रप्रमुख,





सूर्यकांत भाकरे सर सेवानिवृत्त केंद्रप्रमुख, सूर्यकांत दासरवाड सर सेवानिवृत्त केंद्रप्रमुख, तेजराव धुमाळे सेवानिव्रत लिपिक, सत्कारमूर्ती गजानन हुडे प्राध्यापक यशवंत कॉलेज नांदेड, रमाकांत शिंगारे ग्रामसेवक कंधार यांचा सन्मान करण्यात आला या कार्यक्रमांमध्ये प्रमुख पाहुणे म्हणून मार्गदर्शन करीत असताना मानवी हक्क अभियानाचे राज्य अध्यक्ष डॉक्टर मच्छिंद्र गवाले यांनी म्हणाले की नवीन शिक्षण विषयक धोरणावर माहिती देत असताना येणाऱ्या काळामध्ये शिक्षण हे सरकारी मालकीच असलं पाहिजे आणि जोपर्यंत जिल्हा परिषदेच्या शाळा जिवंत राहतील तोपर्यंत गरिबांना शिक्षण मिळेल आणि ते देण्याची जिम्मेदारी शासनाची आहे असे आव्हान त्यांनी या निमित्त केले या कार्यक्रमाचे संचालन श्री पांगरे सर यांनी केले प्रस्ताविक आनंद पांढरे सर यांनी केले तर आभार जाकीर मरखेलकर सर यांनी मांडले या कार्यक्रमास गावातील प्रतिष्ठित नागरिकांची उपस्थिती होती.

# बोरीत चोरट्यांचे पोलिसांना खुले आव्हान; दुसऱ्या दिवशीही चोरी

बोरी/प्रतिनिधी

येथील पोलीस ठाण्याच्या समोरच्या भागात चोरट्यांनी गुरुवारी (दि. २१) धाडसी चोरी करून रात्रभर धुमाकूळ घातल्यानंतर दुसऱ्या दिवशी शनिवारी दारूचे दुकान फोडून श्रीनिवास नगरमध्ये अक्षरशः धुमाकूळ घासला. बोरीत चोरट्यांनी सलग दुसऱ्या दिवशी चोरी करून पोलिसांना एक प्रकारे खुले आव्हान दिल्याचे बोलल्या जात आहे. पोलिसांच्या कार्यवाहीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने याकडे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष द्यावे अशी मागणी होत आहे.

जिंतूर तालुक्यातील बोरी या गावात गेल्या दोन दिवसांपासून चोरट्यांनी चोरीचे सत्र चालूच ठेवले आहे. लहान मोठ्या चोरीच्या घटना सातत्याने घडत आहेत .गावातील पेठ गल्ली, चौधरी गल्ली, माळी गल्ली, गुरव गल्ली व पोलीस ठाण्याच्या समोरील अशा दहा ते बारा



श्रीनिवासनगरमध्ये चोरांचा धुमाकूळ

घरांमध्ये प्रवेश करून अक्षरशः हेदोस घातला आहे. हे चोरटे पोलिसांना न जुमानता अक्षरशः सीसीटीव्ही च्या समोर सुद्धा चोरी करत आहेत. कोणत्याही प्रकारची भीती न ठेवता रात्रभर गावातील गल्लीबोळा मध्ये चोरांचा वावर वाढल्याने नागरिकांमध्ये मात्र घबराट निर्माण झाली आहे.

बोरी येथील मोंढा रोडवर देशी दारूचे दुकान आहे या दुकानाचे शटर फोडून चोरट्यांनी शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी रात्री आत प्रवेश केला. दुकानातील नगदी सव्वा लाख रुपये व दारूच्या बाटल्या पळवल्या. या दुकानाच्या बाजूलाच मोंढा रोडवर इतर बरीच दुकाने आहेत चोरट्यांनी या भागात धुमाकूळ घातला. गुरुवार दिनांक २१ ऑगस्ट रोजी च्या चोरीच्या विविध घटनांमध्ये आणि शनिवार दिनांक २३ ऑगस्ट रोजी च्या चोरीच्या घटनेमध्ये सुद्धा हे सर्व चोरटे सीसीटीव्ही फुटेज मध्ये स्पष्ट दिसत आहेत. असे असतानाही पोलिस तपास कामात गांभीर्य का दाखवत नाहीत? असा सर्वसामान्य नागरिकांना प्रश्न पडला आहे. बोरीच्या पोलिसांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने जिंतूरचे उपविभागीय पोलीस अधिकारी समाधान पाटील यांनी या प्रकाराकडे लक्ष द्यावे, अशी मागणी होत आहे.

वरिष्ठ पोलीस अधिकारी यांनी लक्ष देण्याची गरजबोरीच्या पोलीस ठाण्याचे पोलीस अधिकारी चोरीच्या घटणा गांभीर्याने घेत नसल्याने चोरट्यांचे मनोबल वाढल्याचे दिसून येत आहे तर सर्वसामान्य नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण तयार झाले आहे. यामुळे वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांनी लक्ष देण्याची गरज निर्माण झाली आहे.




देगलुर, प्रतिनिधी

आज दिनांक २४ आगस्ट २०२५ रोजी स्वातंत्र दिनाच्या निमित्ताने देगलूर पब्लिक स्कूल देगलूर आयोजित रक्तदान शिबीर आणि शाळेच्या मुलांचे आरोग्य तपासणी करण्यात आली. या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे शिवसेना उपजिल्हाप्रमुख महेश पाटील पोलिस निरीक्षक मारोतराव मुंढे , युवा सेना तालुका प्रमुख तथा शिवसेना सोशल नेटवर्कर प्रमुख भागवत पाटील सोमुरकर यांनी प्रथमच अमुल्य, अतुल्य , दुर्मिळ असलेले –_ निगेटिव्ह रक्तगटाचे प्रथमच रक्तदान करुन रक्तदान शिबीराचे शुभारंभ केले.,या रक्तदान शिबीरात ५० जणांनी रक्तदान केले यावेळी युवासेना पदधिकारी , राहुल सोनकांबळे, श्रीमती संचालक सीमा इमरान शेख श्रीमती मिर्झा शिरीन बेग संचालक देगलूर पब्लिक स्कूल देगलूर कार्यक्रमात उपस्थित पाहुणे द क्रिसेन्ट ब्लड बँकचे महम्मद सोहेल मिर्झा मुमताज बेग सरपंच भायेगाव,पांचारे केंद्र प्रमुख शिक्षण अधिकारी, चांद मुजावर प्रा. डॉ.भीमराव माळगे प्रा.विकास जोंधळे , अजित पाटील, माधव मैलारे , यावेळी उपस्थित होते.

# नगरकरांनो सावधान! शहरात आढळले नकली सौंदर्यप्रसाधनाचे दुकान

अहिल्यानगर । प्रशांत बाफना

जिल्हा प्रतिनिधी

नकली सौंदर्यप्रसाधनांची विक्री रोखण्यासाठी कोतवाली पोलिसांनी शनिवारी (२३ ऑगस्ट) धडक कारवाई केली. या कारवाईत ५८ हजार ५७१ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला असून तिघा व्यापार्यांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादी चेतन मोतीराम गणात्रा (रा. निगडी, पुणे) हे लिंकबस्टर ट्रेड मार्क अँड अँटी पायरसी कंपनीत इन्व्हेस्टीगेशन ऑफिसर म्हणून कार्यरत असून नित्या ट्रेडिंग कंपनीच्या कॉपीराइट हक्कांचे संरक्षण करण्यासाठी त्यांना नेमण्यात आले आहे. त्यांनी कोतवाली पोलिसांच्या मदतीने ही कारवाई केली.

गणात्रा व सहकारी सत्तार मुनाफ शेख यांनी कोतवाली पोलिस निरीक्षक प्रताप दराडे यांना माहिती दिली. त्यानंतर उपनिरीक्षक गणेश देशमुख व पोलीस पथकासह तीन दुकानांवर छापा मारण्यात आला. पंचांच्या उपस्थितीत छापे टाकून मालाची तपासणी करण्यात आली. जय बाबा कॉस्मेटिक्सचे (मार्केट यार्ड) मालक केशव किशनचंद मोतीयानी (६८, रा. सोनानगर). येथे ३१२ पाकिटे नकली मेहंदी, तसेच साबण व गोरी क्रीम मिळाले. लक्ष्मी कॉस्मेटिक्सचे (मोची गल्ली) मालक प्रकाश वासुदेव सचदेव (५०, रा. सावेडी) येथे ११ पाकिटे नकली मेहंदी व ७८ पाकिटे गोरी क्रीम आढळले. तसेच कॉस्मेटिक्स अँड लेडीज शॉपीचे (मोची गल्ली) मालक विशाल पुरण साखला (४४, रा. पारशाखुट चौक) येथे १२ पाकिटे नकली मेहंदी मिळाली. संपूर्ण कारवाईदरम्यान एकूण ५८ हजार ५७१ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

पंचनाम्यानुसार सॅम्पल ठेवून उर्वरित माल सील करून पोलिसांच्या ताब्यात घेण्यात आला आहे. तिघा दुकानमालकांवर कॉपीराईट ॲक्ट १९५७ कलम ५१ व ६३ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान, या कारवाईत पाकिस्तानात निर्मित उत्पादनेही जप्त करण्यात आले आहे. पोलिसांनी नागरिकांना आवाहन केले आहे की, बाजारात उपलब्ध सौंदर्यप्रसाधनांचा खरेदीपूर्वी बारकाईने तपास करावा, तसेच संशयास्पद किंवा नकली मालाची माहिती पोलिसांना द्यावी

# गणा धाव रे.. मला पाव रे... पारंपरिक लोककलांना जनाधार; गणेशोत्सवानिमित्त तालीम सुरू

गडब/सुरेश म्हात्रे

महाराष्ट्राला लोककलेची मोठी परंपरा लाभली आहे. विशेषतः कोकणात दशावतारी नाटक, शक्तीतुरा, डबलबारी, भजन, कीर्तन आणि जाखडी नृत्य किंवा बाल्या नाच या लोप पावत चाललेल्या लोककलांना पुन्हा सुगीचे दिवस येतांना दिसत आहेत. त्यामुळे गणेशोत्सवानिमि त्त रायगड जिल्ह्यात गावा-गावांत लोककलांची रंगित तालीम सुरू झाली आहे.

श्रावणात महिलांचे मंगळगौरी खेळ, भाद्रपद महिन्यात गणेशोत्सव आणि नवरात्री उत्सव यामध्ये कोकणातील प्रत्येक गावात देखील पारंपारिक लोककला सादर होत असते. मात्र, सध्या नोकरीनिमित्त



शहराकडे आलेला चाकरमानी या कलेपासून दुरावला आहे. त्यामुळे सुधागड तालुक्यातील श्री दत्त गुरु नाच मंडळ याचा जाखडी नाच गेली २२ वर्ष बंद होता. मात्र, येथील नवतरूणांनी तो पुन्हा चालू केला आहे. चव्हाणवाडी ग्रामस्थ मंडळाने नृत्य कलाकारांची जमवाजमव सुरू केली आहे. ही कोकणातील लोककला जिवंत ठेवण्यासाठी हे मंडळ तत्पर झाले आहे. यावेळी पारंपरिक जाखडी नृत्याचा बाळकूम येथील मरू आईच्या मंदिरात शुभारंभ करण्यात आला. दर शनिवार-रविवार या मंडळाची रंगित तालिम या ठिकाणी सुरू असते. तर, ठाणे आणि भिवंडीमध्ये पुंडलिकबुवा मोरे यांच्या माध्यमातून नवीन होतकरू कलाकार मंडळींना तेजस

मोरे आणि सौजस मोरे हे लोकसंगिताचे धडे देत आहेत. गावची कलाकार मंडळी फावल्या वेळात जाखडी नृत्य, शक्ती तुरा, भजन कीर्तन यात दंग होत आहेत. खरंतर लोककला जपणे आणि आपली संस्कृती टिकवणे यासाठी ही मंडळी अहोरात्र मेहनत घेतात. विषेश म्हणजे त्याच्यात मुलींचा सुद्धा सहभाग आहे.

*आपल्या भावी पिढीला ही कला समजावी व त्यांनी देखील हि पारंपरिक कला अधिक समृद्ध त्यासाठी आपली वैयक्तिक जबाबदारी म्हणून मागील १५ वर्षांपासून बाल्या व माळी नाच ही कला जतन करत आहोत. गावातील सर्व ग्रामस्त आम्हाला प्रोत्साहन देऊन सहकार्य करतात. पारपारीक कला टिकावी यासाठी आमचा हा छोटासा प्रयत्न आहे. गणेशोत्सव निमित्त सराव सुरू केला आहे.*

* नितीन पाटील, तरुण कलाकार,

दैनिक समर्थ राजयोग
राजमान्य-राजशक्ती
SAMARTH RAJYOG



# मैत्री जपणारे सुभाष गंगाधर धोंडे यांचा दि.२९ऑगस्ट रोजी सेवापुर्ती सोहळा

आष्टी ।प्रतिनिधी

नियत वयोमानानुसार वयाची ५८ वर्ष पुर्ण झाल्यामुळे पंचायत समिती आष्टी, ता. आष्टी, जि. बीड येथील जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग आष्टी चे कनिष्ठ सहाय्यक सुभाष गंगाधर धोंडे हे दि. ३१ ऑगस्ट २०२५ रोजी सेवानिवृत्त होत आहेत. या निमित्त सुभाष गंगाधर धोंडे यांचा सेवापुर्ती गौरव सोहळा शुक्रवार दिनांक २९ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ११ वा. मोरेश्वर मंगल कार्यालय, गणपती चौक, आष्टी, जि. बीड येथे आयोजित करण्यात आला आहे.



वेळप्रसंगी कडक शिस्तीचे, आपल्या बोलण्यातून सर्वांना आकर्षित करणारे, समोरच्या व्यक्तीला कितीही राग आला तरी आपलेसे करुन बोलणारे व समजावणारे, उत्कृष्ट प्रशासकीय कामकाज करणारे, सर्व कर्मचाऱ्यांशी मिळून मिसळून राहणारे, आपले दुःख लपवून इतरांना आनंदी ठेवणारे, कर्तव्यदक्ष, कर्तव्यशिल, एक अभ्यासू, कर्तुत्वान, शांत, संयमी, सदैव इतरांच्या सुख - दुःखात सामिल होणारे, आपुलकीने वागणारे, मोठ्यांचा आदर करणारे, मनमिळाऊ स्वभाव आसणारे, सतत हसत मुख असणारे, माणुसकी ठेवणारे, मैत्री जपणारे आदर्श व्यक्तीमत्व म्हणजे सुभाष धोंडे हे आहेत.

तरी या सेवापुर्ती सोहळ्यास प्रमुख अतिथी म्हणून गोकुळ वैजीनाथ बागलाने (प्रशासक तथा गटविकास अधिकारी पं. स. आष्टी), मधुकर सीताराम निंबाळकर (उपअभियंता जि. प. बांधकाम उपविभाग आष्टी) तसेच पंचायत समिती आष्टी विभागा अंतर्गत सर्व अधिकारी, कर्मचारी हे उपस्थित राहणार आहेत.

तरी या सेवापुर्ती सोहळ्यास राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक व साहित्य क्षेत्रातील मान्यंवरांनी तसेच मित्र परिवार, आपेष्ट, नातेवाईक, सेवा काळातील सर्व माझे कार्यालयीन सोबती कर्मचारी बंधू - भगिनींनी मोठ्या संख्येने उपस्थित रहावे असे आवाहन सुभाष धोंडे यांनी केले आहे. सेवापुर्ती सोहळ्यानंतर दुपारी १ ते ५ या वेळेत स्नेह भोजनाचे आयोजन करण्यात आले आहे असे संयोजन समितीने शेवटी सांगितले आहे.

# संभाजी ब्रिगेडच्या बीड जिल्हाध्यक्ष पदावर निवड झाल्याबद्दल सुरज खोडसे यांचा सत्कार संपन्न



**केज/प्रतिनिधी**

**नेतृत्व व कर्तुत्व कोणा कडून उसने घेता येत नाही ते स्वतःलाच निर्माण करावे लागते, नायगाव येथील भुमी पुत्र कोणत्याही प्रकारचा राजकीय वारसा नसताना स्वतःच्या कर्तुत्वाने व नेतृत्वाच्या माध्यमातून केज तालुक्यामध्ये सामाजिक स्तरातून नेहमीच पुढाकार घेऊन प्रशासनाच्या माध्यमा तून सामाजिक कार्य पार पडणे हा सुरज खोडसे यांचा हातखंडा,**

सदर सामाजिक कार्याची दखल घेऊन महाराष्ट्र राज्य संभाजी ब्रिगेडचे प्रदेशाध्यक्ष श्री. मनोज आखरे व महा सचिव सौरभ खेडेकर, प्रदेश प्रवक्ते श्री.गंगाधर बनबरे व सर्व प्रदेश कार्यकारिणीच्या उपस्थितीत त्यांना बीड जिल्हा संभाजी ब्रिगेड जिल्हाध्यक्षपदी त्यांची निवड करण्यात आली त्या अनुषंगाने सोमवार दि.२५ आगष्ट रोजी श्री.खोडसे सी.ए. लेखा परीक्षक यांच्या कार्यालयामध्ये त्यांचा सत्कार करून पुढील यशस्वी कार्यासाठी शुभेच्छा देण्यात आल्या यावेळी श्री.एस.एस ढगे,श्री.बलभीम खोडसे,श्री.भारत खोडसे,श्री.कमलाकर चव्हाण व श्री.अभिषेक ताकतोडे आदी मान्यवर उपस्थित होते.

# पसमंदा ओबीसी सामाजिक संघटनेच्या अध्यक्षपदी सय्यद शफाऊद्दीन यांची निवड

पाटोदा । प्रतिनिधी

ऑल इंडिया पसमंदा (ओबीसी) सामाजिक संघटना ओबीसी समाजासाठी पुर्ण देशात संस्थापक, राष्ट्रीय अध्यक्ष डॉक्टर शाकिर आली मंसुरी यांच्या नेतृत्वाखाली काम करत आहे. या संघटनेची दि. २४ रविवार २०२४ रोजी पाटोदा येथे प्रदेशाध्यक्ष सादेक पिंजारी यांच्या अध्यक्षतेखाली बैठक संपन्न झाली या बैठकीचे प्रमुख पाहुणे म्हणून माजी जि. प. अध्यक्ष तथा नगरसेवक सय्यद अब्दुल्ला हे उपस्थित होते.यावेळी पाटोदा येथील किसान मशिनरी चे मालक सय्यद शफाऊद्दीन यांची तालुकाध्यक्षपदी तर उपाध्यक्षपदी सय्यद अतिक शहा यांची निवड करण्यात आली. सय्यद शफाऊद्दीन व अतिकशहा यांना माजी



जिल्हा परिषद अध्यक्ष सय्यद अब्दुल्ला यांचे हस्ते नियुक्ती पत्र देण्यात आले यावेळी

या बैठकीत महाराष्ट्रात प्रसिद्ध असलेले जनता ब्रास बन्डचे मास्टर सय्यद शफीक, माजी सरपंच तथा न.प.माजी सभापती सय्यद मुख्तार, अड. जब्बार पठाण, सय्यद शफीक सय्यद हसन, शेख सरफराज, सय्यद शेरु, सय्यद माजेद पटेल, इतर उपस्थित होते. या निवडीबद्दल सय्यद आणि शहा यांचा सत्कार करुन शुभेच्छा देण्यात आल्या.

# हवामान बदल लक्षात घेऊन शेतकऱ्यांनी तंत्रज्ञान वापरावे - आ.सुरेश धस

आष्टी ।प्रतिनिधी

विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम करून पशुधनातील दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली हवीत. तसेच हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे असे मत आमदार सुरेश धस यांनी व्यक्त केले. दीनदयाल शोध संस्थान कृषि विज्ञान केंद्र अंबाजोगाई यांच्या वतीने प्रक्षेत्र दिवस उडीद व रब्बी पीक व्यवस्थापन मार्गदर्शन कार्यक्रम (दि. २३ रोजी) हरिनारायण आष्टा ता. आष्टी येथे घेण्यात आला.कार्यक्रमाचे अध्यक्ष माजी जि. प. सदस्य अमरराजे निंबाळकर हे होते. प्रमुख पाहुणे गोरख



तरटे तालुका कृषी अधिकारी आष्टी व सागर पठाडे तालुका कृषी अधिकारी केज हे होते. कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार सुरेश धस यांनी केले. व्यासपीठावर गणेश माळवे सरपंच आष्टा, वैभव पठाडे उपसरपंच आष्टा तसेच कृषि विज्ञान केंद्रातील शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी, कृष्णा कर्डिले, प्रमोद रेणापुरकर, डॉ. प्रदीप सांगळे यांचीही उपस्थिती होती.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक कृष्णा कर्डिले, शास्त्रज्ञ (पीकविद्या) यांनी केले. कडधान्यवर्गीय पिकांचे उत्पादन वाढविण्यासाठी नवीन तंत्रज्ञानाचा प्रसार - प्रचार व्हावा तसेच मृदा आरोग्य व्यवस्थापनाबरोबर शेतकरी उत्पादन व उत्पन्न वाढावे हा या कार्यक्रमाचा हेतु असल्याचे सांगून कृषि विज्ञान केंद्राने आष्टी तालुक्यात केलेल्या कामाची माहीतीही त्यांनी दिली. उद्यानविद्या शास्त्रज्ञ नरेंद्र जोशी यांनी कांदा लागवडीबाबत माहीती देताना जुन्या वाणाच्या वापराऐवजी नवीन वाण लागवड व बिजोत्पादनाबाबत मार्गदर्शन केले. नवीन संशोधित वाण लागवड तंत्रज्ञान व साठवणुकीतील बदलावर त्यांनी प्रकाश टाकला. कांदा लागवडीची पंचसुत्री शेतकऱ्यांना दिली. कार्यक्रमात शेतकरी यशोगाथा पुस्तिकेचे विमोचन करण्यात आले. तसेच शेतकरी प्रणोम शिंदे व सतीश पठाडे यांनी मनोगत व्यक्त केले. केंद्राने केलेल्या कामामुळे २२ ते ३० %. उत्पादन वाढुन खर्च कमी झाल्याचे त्यांनी सांगितले.

उद्घाटनपर मार्गदर्शनात आमदार सुरेश धस यांनी सांगितले की, विद्यापीठांनी नवीन तंत्रज्ञान विकसित करून शेतकऱ्यांच्या बांधावर पोहचविण्यासाठी काम केले पाहीजे. पशुधनातील दुग्धोत्पादन वाढविण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञान वापरली पाहीजे तसेच पर्यावरणीय असंतुलन, हवामान बदलाकडे लक्ष दिले पाहिजे. नामशेष होणारी पिके, मिलेट लागवड वाढवली पाहीजेत. हवामानाचा अचुक अंदाज घेवुन तंत्रज्ञानात बदल करून उत्पादन वाढ केली पाहीजे.

# लोकांची सेवा करणाऱ्यांना संधी मिळायला हवी - पप्पू कागदे

## केज येथील रिपाईंच्या संकल्प मेळाव्याच्या माध्यमातून पप्पू कागदे यांनी फुंकले स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग

केज ।प्रतिनिधी

निळ्या झेंड्याखाली शोषित पीडित लोकांची सेवा करणाऱ्या कार्यकर्त्यांना संधी द्यायला हवी.केंद्रिय सामाजिक न्यायमंत्री रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली चळवळीत काम करणारा कार्यकर्ता हा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांशी बांधिलकी जपणारा कार्यकर्ता आहे.म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीत दीपक कांबळे यांच्या उमेदवारीवर पप्पू कागदे यांनी जणू शिक्कामोर्तब करून स्थानिक स्वराज्य संस्थेचे रणशिंग फुंकले. तसेच यावेळी मेळाव्याचे संयोजक दीपक कांबळें यांनी यावेळी सांगितले की, केंद्रीय मंत्री रामदास आठवले आणि पप्पु कागदे यांच्या नेतृत्वा खाली बहुजन समाजाला सोबत घेऊन सामाजिक अभिसरण सुदृढ करण्याची प्रक्रिया आणि सामाजिक चळवळ गतिमान करणार आहे.कार्यकर्ते सोबत घेऊन आम्ही त्यांच्या मूलभूत हक्कासाठी लढत आहोत.

दि.२५ ऑगस्ट रोजी केज रिपाइंचे वतीने दीपक कांबळे यांनी केज येथील मुक्ताई लॉन्स येथे संकल्प मेळावा आयोजित केला होता.या मेळाव्याला मराठवाडा संघटक मजहर खान, मराठवाडा संघटक गोवर्धन वाघमारे,जिल्हा सल्लागार उत्तम मस्के, प्रभाकर चांदणे,दशरथ सोनवणे,कपिल कागदे, रवींद्र जोगदंड,विकास मस्के,ईश्वर सोनवणे, राहुल सरवदे यांची प्रमुख उपस्थिती होती.



या संकल्प मेळाव्याला उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांशी संवाद साधताना पप्पू कागदे यांनी आगामी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका आणि जिल्हा परिषद व पंचायत समितींच्या निवडणुकीच्या माध्यमातून उपेक्षित आणि सामन्यांच्या कामासाठी अहोरात्र मदतीसाठी रस्त्यावर असलेल्या कार्यकर्त्यांना संधी मिळावी.तसेच निळ्या झेंड्याच्या माध्यमातून सेवा करण्याची अशा कार्यकर्त्यांना समाजाने संधी देण्याचे आवाहन करीत अप्रत्यक्षरित्या त्यांनी दीपक कांबळे यांच्या जिल्हा परिषदेच्या उमेदवारीवर शिक्कामोर्तब करून एका अर्थाने स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुकीचे रणशिंग फुंकले आहे.तसेच पुढे बोलताना कागदे यांनी रिपाइं चळवळीच्या माध्यमातून आणि रामदास आठवले यांच्या नेतृत्वाखाली बीड जिल्ह्यातील ५ हजार एकर जमीन ही भूमिहीन अतिक्रमण धारकांना मिळवून दिली असून ३ हजार भूमिहीनांना त्याच्या सात बारा मिळवून देण्याचे काम केले आहे तसेच शासनाच्या विविध योजनांचा लाभ देण्यासाठी कार्यकर्ते काम करीत असतात. रामदास आठवले यांनी राज्याचे समाजकल्याण मंत्री असताना त्यांनी मराठवाडा विद्यापीठ नामांतराचा प्रश्न सोडविला.त्यासाठी त्यांनी त्यांचे मंत्रीपद देखील पणाला लावले. त्यामुळे तत्कालीन सरकारला विद्यापीठाचे नामांतर करण्याचा निर्णय घ्यावा लागला. रिपाइंच्या माध्यमातून दलीत,शोषित,पीडित समाजाला न्याय देण्याचे काम कार्यकर्ते निस्वार्थीपणे काम करीत असल्याचा उल्लेख केला.यावेळी संकल्प मेळाव्याच्या संयोजक दीपक कांबळे यांनी प्रास्ताविक करताना सांगितले की, डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचार समाजाभिमुख करण्या साठी आणि सामाजिक चळवळ गतिमान करण्यासाठी रामदास आठवले आणि पप्पू कागदे यांच्या नेतृत्वा खाली काम करीत आहोत.उपेक्षित आणि बहुजन समाजालान्याय मिळून देण्यासाठी काम करीत असल्याचा देखील त्यांनी उल्लेख केला.तसेच गायरान जमिनी,स्मशानभूमी, घरकुल आणि विविध सरकारी योजना यात कुणाची अडवणूक होत असेल तर त्यासाठी आम्ही अहोरात्र संघर्ष करून समाजाला न्याय मिळवून देण्याचे काम कार्यकर्त्यांच्या माध्यमा तून करीत असल्याचा उल्लेख त्यांनी केला.

संकल्प मेळावा यशस्वी करण्यासाठी गौतम बचुटे,दिलीप बनसोडे, ईश्वर सोनवणे,विकास मस्के,रमेश निशिगंध, निलेश ढोबळे,राजेश सोनवणे,सुरज काळे, बाळासाहेब ओव्हाळ, प्रशांत हजारे,अनिता वाघमारे,सुरेखा गायकवाड,सरस्वती शिनगारे,विकास आरकडे,भारत गायकवाड,मिलिंद भालेराव,कैलास जावळे,हरीश गायकवाड,दादाराव धेंडे,अंबादास तुपारे, रुपचंद ढालमारे, इब्राहिम इनामदार, शेख मौला,जयपाल रोकडे,प्रदिप शिनगारे, नितीन घोडके,हरेंद्र धीरे,डॉ.चत्रभुज हिरवे, मसु बचुटे,विनोद गायकवाड,रवींद्र तुपारे, संभाजी हजारे,विनोद शिंदे,रोहित बचुटे, राहुल बचुटे आदींनी केले आहे.कार्यक्रमाचे सुत्रसंचालन दिलीप बनसोडे यांनी तर आभार गौतम बचुटे यांनी मानले.




# विवाह समस्येवर वधु -वर मेळाव्यातूनच जागरूकता निर्माण होईल -नंदकिशोर मुंदडा

## अ.भा.पेशवा संघटनेचा वधु-वर मेळावा उत्साहात

अंबाजोगाई(प्रतिनिधी)

दिवसेंदिवस बिकट बनत चाललेल्या विवाह समस्येवर अशा प्रकारच्या मेळाव्यातूनच जागरूकता निर्माण होऊन निराकरण होण्यास मदत होईल असे मत सामाजिक कार्यकर्ते नंदकिशोर मुंदडा यांनी व्यक्त केले. ते अ.भा.पेशवा संघटना बीड जिल्हा शाखा अंबाजोगाई च्या वतीने सातव्या राज्यस्तरीय वधू वर मेळाव्यात बोलत होते अध्यक्षस्थानी भाजपाचे विभागीय प्रवक्ते राम कुलकर्णी होते. व्यासपीठावर डॉ.अतुल देशपांडे,पेशवा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सचिन वाढे पाटील, लक्ष्मीकांत दडके, मोरेश्वर मार्डीकर,विजय काथे,संतोष जोशी आदी उपस्थित होते. पुढे बोलताना मुंदडा म्हणाले की, ब्राम्हण समाजाच्या उत्कर्षासाठी स्थापन करण्यात आलेल्या परशुराम विकास महामंडळाच्या स्थापनेत आ.नमिता मुंदडा यांचा सहभाग होता आता पुढील काळात या महामंडळाच्या माध्यमातून ब्राह्मण समाजाच्या विकासासाठी प्रयत्न होतील असाही आशावाद त्यांनी व्यक्त केला.

डॉ.देशपांडे म्हणाले की, अ.भा.पेशवा संघटनेच्या मेळाव्याव्दारे वधु -वरांच्या विवाह समस्येचे निराकरण होईल. अध्यक्षीय समारोपात राम कुलकर्णी म्हणाले की, समाजात विवाहासारखी समस्या मोठ्या प्रमाणात भेडसावत असून यावर विचार विनिमय करण्याची गरज असल्याचे सांगुन अशा कार्यक्रमासाठी सर्वतोपरी मदत करण्याची तयारी त्यांनी दर्शविली.

प्रारंभीच्या प्रास्तविकातून सचिन वाढे पाटील यांनी संघटनेच्या कार्याची माहिती दिली. संचालन आरती सोनेसांगवीकर, अंजली देशपांडे यांनी तर आभार सुधीर धर्माधिकारी यांनी मानले.

# न्यायासाठी उपोषणाचा इशारा

## वडिलोपार्जीत घर पाडल्याने पीडितांचा संताप

लोहा ।प्रतिनिधी

वडिलोपार्जीत घर बेकायदेशीरपणे पाडण्यात आल्याचा गंभीर आरोप करत पीडित कुटुंबाने जिल्हाधिकारी नांदेड यांच्याकडे तक्रार अर्ज सादर केला आहे. मात्र, संबंधित प्रशासनाकडून ठोस कारवाई न झाल्याने न्याय मिळावा, यासाठी आता उपोषण करण्याचा इशारा देण्यात आला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, १४ जुलै २०२५ रोजी जिल्हा परिषद नांदेडचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी सुनावणी घेऊन गटविकास अधिकाऱ्यांना जागेची मोजणी करून चौकशी अहवाल सादर करण्याचे आदेश दिले होते. तरीदेखील आजतागायत कोणतीही कार्यवाही झालेली नाही. उलट, ग्रामपंचायतीकडून वडिलोपार्जीत उर्वरित जागा अतिक्रमित करण्याच्या हालचाली सुरू असल्याची भीती पीडितांनी व्यक्त केली आहे. प्रशासनाकडून न्याय मिळाला नाही तर संपूर्ण कुटुंबासह उपोषण करावे लागेल, असा इशारा संबंधितांनी जिल्हाधिकाऱ्यांना दिला आहे. निवेदनाच्या प्रती मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी (पं.), तसेच वजीराबाद पोलीस निरीक्षक यांना देण्यात आल्या आहेत. त्यामुळे या प्रकरणात न्याय मिळतो का, की पीडितांना खरोखरच उपोषणाचा मार्ग पत्करावा लागतो, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

पीडितांचा आक्रोश

भानुदास उत्तरवार (बोरगाव) यांनी सांगितले की, गट नंबर १ मधील ४७आर जमिनीत आमच्या नावे २ आर जमिन आहे. त्या ठिकाणी आमचे वडिलोपार्जीत घर बांधलेले असतानाही ग्रामपंचायत अधिकाऱ्यांनी अतिक्रमण असल्याचे सांगून नोटीस दिली. दुसऱ्या दिवशी जेसिपीच्या सहाय्याने घर पाडण्यास सुरुवात केली. मी त्यांना स्पष्ट सांगितले की हे वडिलोपार्जीत घर असून, ते पाडण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांची परवानगी आवश्यक आहे. पण माझे काहीही न ऐकता घर पाडण्यात आले, असा गंभीर आरोप त्यांनी केला. चुकीचे काम करणाऱ्या ग्रामपंचायत अधिकारी यांना तात्काळ निलंबित करण्याची मागणी केली.

# आंतरराष्ट्रीय चर्चासत्रामुळे आदिवासींच्या उत्कर्षाचे नवे मार्ग समोर येतील - आमदार विक्रम काळे

## यापुढे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे नियोजन कसे करावे, याचे धडे इतर महाविद्यालयांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून घ्यावेत – मान्यवरांचा सूर





बीड /प्रतिनिधी

आजही भारतातील बहुतांश आदिवासी समाज पाड्यांवर, वाड्यांवर व वस्त्यांवर जीवन जगत आहे. तो विकासाच्या मुख्य प्रवाहापासून कोसो दूर आहे. या आंतरराष्ट्रीय चर्चासत्राच्या निमित्ताने आदिवासी समाजाच्या समस्यांबाबत देश-विदेशातील संशोधक व अभ्यासक एकत्र आले. यानिमित्ताने त्यांच्या प्रश्नांवर सखोल विचारमंथन झाले. यातून आदिवासींच्या उत्कर्षाचे नवे मार्ग समोर येतील. यापुढे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे नियोजन कसे करावे, याचे धडे इतर महाविद्यालयांनी डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून घ्यावेत, इतके नेटके नियोजन त्यांनी केले, असे गौरवोद्गार छत्रपती संभाजीनगर शिक्षक मतदारसंघाचे आमदार विक्रम काळे यांनी काढले.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५० व्या जयंती वर्षानिमित्त 'जनजाती गौरव' विशेष कार्यक्रमांतर्गत 'भारतीय इतिहासाच्या जडणघडणीत जनजाती (आदिवासी) समाजाचे योगदान व भूमिका' या विषयावर आधारित दोन दिवसीय आंतरराष्ट्रीय चर्चासत्र उत्साहात पार पडले. सोमवारी (दि.२५) बीड येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात चर्चासत्राची यशस्वी सांगता झाला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून आमदार विक्रम काळे बोलत होते.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नवगण शिक्षण संस्थेच्या सहसचिव डॉ.दीपाताई क्षीरसागर होत्या. प्रमुख पाहुण्यांमध्ये दक्षिण आफ्रिका विद्यापीठाचे मानववंशशास्त्र व पुरातत्वशास्त्र विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.झोडवा रादेबे, कला व संगीत विभागाचे वरिष्ठ प्राध्यापक डॉ.बोंगानी मखोंझा, नवगण शिक्षण संस्थेचे सचिव डॉ.योगेश क्षीरसागर, जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील, सामाजिक कार्यकर्ते डॉ.अशोक बेलखोडे, डॉ.सारिकाताई क्षीरसागर, आमेर सिद्दिकी, डॉ.शिवानंद क्षीरसागर आदी मान्यवर उपस्थित होते.पुढे बोलताना आ.विक्रम काळे म्हणाले, डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासारख्या नवतरुणाच्या हाती नवगण शिक्षण संस्थेची धुरा सोपविल्यानंतर संस्थेत आमूलाग्र बदल दिसू लागले आहेत. त्यांच्या नेतृत्वाखाली आदिवासी विषयांवर प्रकाश टाकण्यासाठी आयोजित चर्चासत्रात ३ देशांमधून ७ जणांनी नोंदणी केली, हेच या उपक्रमाचे यश आहे. तसेच परराज्यातून २५ जणांनी सहभाग घेतला. जसे काही प्राचार्य मंडळीकडून नॅकसंदर्भात मार्गदर्शन घेतले जाते, त्याचप्रमाणे आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन कसे करावे याचे मार्गदर्शन डॉ.योगेश क्षीरसागर यांच्याकडून घ्यावे, असे मला वाटते. अगदी परराज्यातील कलावंतांना आमंत्रित केले. आदिवासी विषयांवर सर्व अंगाने प्रकाश टाकला, असे ते म्हणाले. प्रास्ताविक प्रा.बळीराम राख यांनी केले. सूत्रसंचलन पत्रकार मयुरा सावी यांनी केले, तर आभार चर्चासत्राचे निमंत्रक प्रा.हमराज उईके यांनी मानले. चर्चासत्रात आदिवासी समाजातील संघटनांचे पदाधिकारी, प्रतिनिधी, प्राध्यापक, शिक्षकांचा सहभाग घेतला.

### बिरसा मुंडा यांच्या विचारांचा सखोल अभ्यास व्हावा –संगीतादेवी पाटील

जिल्हा परिषदेच्या ग्रामीण विकास यंत्रणेच्या प्रकल्प संचालक संगीतादेवी पाटील यांनी मनोगत व्यक्त करताना म्हटले की, आदिवासी समाजातील स्त्री-पुरुष समानता व पर्यावरणपूरक जीवनशैली ही अनुकरणीय बाब आहे. डॉ.योगेश क्षीरसागर यांच्या प्रयत्नांमुळे या चर्चासत्राचा बहुमान बीडला मिळू शकला. त्या पुढे म्हणाल्या की, आदिवासी नायक बिरसा मुंडा यांनी समाजात क्रांती निर्माण केली. त्यांच्या विचारांचा सखोल अभ्यास व्हावा, असे आवाहन त्यांनी केले.

### डॉ.क्षीरसागर दांपत्यासह प्रा.हमराज उईके यांचा सत्कार

आंतरराष्ट्रीय चर्चासत्राचे उत्कृष्ट नियोजन केल्याबद्दल डॉ.योगेश क्षीरसागर व डॉ.सारिकाताई क्षीरसागर यांचा सत्कार संस्थेचे प्रशासक, सर्व प्राचार्य तसेच बीड जिल्ह्यातील आदिवासी समाजाच्या वतीने करण्यात आला. तसेच चर्चासत्राचे निमंत्रक प्रा.हमराज उईके यांनी विशेष परिश्रम घेऊन कार्यक्रम यशस्वी केल्याबद्दल त्यांचा नवगण शिक्षण संस्थेच्यावतीने सत्कार करण्यात आला.

### आयुष्यातील महत्त्वाचा अनुभव बीडच्या कॉन्फरन्समध्ये मिळाला : प्रा.डॉ.बोंगानी मखोंझा

### चर्चासत्रातून आदिवासी समाजघटकांना दिशा मिळणार : डॉ.दीपाताई क्षीरसागर

अध्यक्षीय भाषणात डॉ.दीपाताई क्षीरसागर म्हणाल्या, फारसा परिचित नसलेला आदिवासी समाजाचा विषय बीडमध्ये आंतरराष्ट्रीय चर्चासत्रातून चर्चेत आला. आदिवासी समाजघटकांना पुढील दिशा मिळेल व त्यांच्या प्रश्नांवर उपाययोजना आखल्या जातील. त्या पुढे म्हणाल्या की, स्व.केशरकाकू क्षीरसागर यांनी स्थापन केलेल्या नवगण शिक्षण संस्थेचा कारभार आता नूतन सचिव डॉ.योगेश क्षीरसागर पाहत आहेत. सचिवपदी निवडीनंतर पहिल्यांदाच त्यांनी संस्थेच्या माध्यमातून आंतरराष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले. हा निर्णय कौतुकास्पद असून प्रारंभ ते समारोपापर्यंत उत्साह कायम राहिला.

### परदेशी पाहुण्यांनी साकारली महाराष्ट्राची वेशभूषा

दक्षिण आफ्रिकेतून आलेल्या परदेशी पाहुण्यांनी महाराष्ट्रातील पारंपारिक वेशभूषा परिधान केली होती. या वेशभूषेने उपस्थितांचे विशेष लक्ष वेधले.

# पत्रकारांचे लढवय्ये नेतृत्व संजय भोकरे साहेब

## शिक्षण, पत्रकारिता व समाजकारणातील योगदानाचा गौरव!

**अहमदनगर –सांगली जिल्ह्यातील संजय भोकरे हे नाव आज शिक्षण, पत्रकारिता आणि समाजकारण या तिन्ही क्षेत्रात आदराने घेतले जाते. शिक्षण क्षेत्रात व्यावसायिक अभ्यासक्रम उपलब्ध करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवी दिशा देणारे, तर पत्रकारांच्या हक्कांसाठी सातत्याने शासन दरबारी पाठपुरावा करणारे भोकरे साहेब हे खऱ्या अर्थाने पत्रकारांचे लढवय्ये नेतृत्व आहेत.**

**शिक्षणातील योगदान:**

संजय भोकरे यांनी संजय भोकरे ग्रुप ऑफ इन्स्टिट्यूट्स, मिरज ची स्थापना करून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी अभियांत्रिकी आणि फार्मसीसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांची दारे खुली केली. शिक्षण क्षेत्रातील त्यांच्या या कार्यामुळे अनेक विद्यार्थ्यांना नवी संधी मिळाली आहे. आधुनिक तंत्रज्ञान, प्रयोगशील शिक्षण आणि गुणवत्तापूर्ण अभ्यासक्रम यावर त्यांनी नेहमीच भर दिला आहे.

**पत्रकारिता क्षेत्रातील लढवय्ये:**

भोकरे साहेब हे महाराष्ट्र राज्य पत्रकार महासंघाचे राज्य संघटक आहेत. ग्रामीण तसेच शहरी भागातील पत्रकारांच्या समस्या सोडवण्यासाठी ते सतत कार्यरत आहेत.

त्यांनी शासनाकडे खालील महत्त्वाच्या सुविधा पत्रकारांसाठी उपलब्ध करून देण्याची मागणी केली आहे :

आरोग्य विमा संरक्षण.
पाच लाख रुपयांचे विमा कवच.
मोफत रेल्वे, एस.टी. व एअरलाईन प्रवास सुविधा.
शासकीय विश्रामगृहांवर प्राधान्यक्रम.
पत्रकार भवनांची उभारणी.

या मागण्यांचा सातत्याने पाठपुरावा करून त्यांनी ग्रामीण पत्रकारांनाही न्याय मिळवून देण्याचा प्रयत्न केला आहे.

**पत्रकार संघटनात्मक कार्य:**

भोकरे साहेबांच्या नेतृत्वाखाली महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाने विविध उपक्रम राबवले आहेत :

सांगली, पुणे, कोल्हापूर, मुंबई, औरंगाबाद येथे पत्रकार भवनांची उभारणी.
दिवंगत पत्रकारांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत.
गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व शिष्यवृत्ती योजना.
विभागनिहाय अधिवेशने, पत्रकार दिन साजरे करणे.
पत्रकार संवाद यात्रा.
सांस्कृतिक, सामाजिक, शैक्षणिक क्षेत्रातील मान्यवरांचा गौरव.

पत्रकारांच्या सन्मानासाठी त्यांनी 'लाडका पत्रकार योजना' सुरू करण्यासाठीही शासन दरबारी पाठपुरावा केला आहे.

**राष्ट्रीय स्तरावरील विस्तार:**

महाराष्ट्रापुरतेच मर्यादित न राहता संजय भोकरे यांच्या नेतृत्वातून पत्रकार संघटनेचा विस्तार राज्याबाहेर देखील झाला. दिल्ली येथे 'ऑल इंडिया जर्नालिस्ट' या संघटनेची स्थापना करून त्यांनी देशपातळीवर पत्रकारांना एकत्र आणण्याचे काम केले आहे.

पुरस्कार व गौरव:

संस्थापक संघटक



महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघाचे प्रदेश संघटक
**मा.श्री.संजयजी भोकरे साहेब**

शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार प्राप्त.
उत्कृष्ट पत्रकारिता जीवन गौरव पुरस्कार.
सामाजिक व शैक्षणिक कार्यातील विविध सन्मान.

त्यांच्या कार्यामुळे आज ग्रामीण पत्रकारांपासून ते मोठ्या वृत्तपत्रांच्या संपादकांपर्यंत सर्वत्र त्यांचा सन्मान केला जातो.

**सामाजिक व मानवीय कार्य:**

भोकरे साहेब नेहमीच समाजाशी जोडलेले राहिले. विद्यार्थ्यांचे कौतुक करणे, पत्रकारांच्या अडचणीत मदतीचा हात देणे, संघटनात्मक बांधिलकी वाढवणे या कामात ते सदैव अग्रस्थानी असतात. गुणवंतांच्या पाठीवर शाबासकीची थाप द्यावी हा त्यांचा स्वभाव आहे.

**थोडक्यात:**

संजय भोकरे हे केवळ शिक्षणतज्ज्ञ किंवा पत्रकार संघटक नसून ते पत्रकारांच्या हक्कांसाठी लढणारे, शिक्षण क्षेत्रात उज्ज्वल भविष्य घडवणारे आणि समाजसेवेच्या माध्यमातून लोकांचे आयुष्य उजळवणारे व्यक्तिमत्व आहेत.

त्यांचा वाढदिवस म्हणजे केवळ शुभेच्छांचा दिवस नसून त्यांच्या कार्याचा गौरव करण्याची एक सुवर्णसंधी आहे.

वाढदिवस विशेष लेख

**शब्दांकन : डॉ. विश्वासराव आरोट**
प्रदेश सरचिटणीस, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई

